

पोलिसांच्या घरांच्या प्रश्नावर ठोस भूमिका घेणार का? / पान २

लोकांचे दैनिक

# लोकशाही वार्ता

epaper.lokshahivarta.in



भारताच्या वैभवने इंग्लंडच्या गोलंदाजांना लोळवले / पान ८

नागपूर। वर्धा। चंद्रपूर। गडचिरोली। भंडारा। गोंदिया। अमरावती। यवतमाळ । अकोला। वाशीम। बुलडाणा-खामगाव जिल्ह्यात वितरित होणारे दैनिक

वर्ष-१६, अंक- ११०, पृष्ठे : ८ + गुडमॉर्निंग, किंमत ५.०० रुपये | नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५ | RNI No. MAHMAR/2010/35482 | अग्रलेख - रिझर्व्ह बँकेचा मोलाचा सल्ला ******


## जि.प.च्या १८ हजार शाळा बंद होणार

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली सभागृहात माहिती



**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्रातील १८ हजार जिल्हा परिषद शाळा बंद होणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान सभेमध्ये दिली. जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या २० पेक्षाकमी असल्याने राज्य सरकारकडून हा निर्णय घेतला जात आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

राज्यात २०२५-२६चा शैक्षणिक वर्ष सुरू झाला आहे. दरम्यान या नव्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील अनेक शाळांमधील पटसंख्या कमी झाली आहे. अनेक जिल्ह्यातील शाळांमध्ये पटसंख्या वीस पेक्षा कमी झाली आहे. यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळा आता बंद केले जाणार आहे.

याबाबत राज्य सरकारकडून पावसाळी अधिवेशनात माहिती देण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, राज्यातील १८ हजार शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाली आहे. राज्यात जिल्हा परिषदच्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी १८ हजार शाळांमध्ये २०पेक्षा कमी पटसंख्या असल्याची नोंद करण्यात आली आहे. २० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद केल्या जाणार आहेत.

## शाळांमध्ये कंत्राटी चतुर्थ श्रेणी कर्मचारी भरती

### शिक्षण मंत्री दादा भुसे यांची विधानपरिषदेत घोषणा



**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यातील शाळांमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती आता कंत्राटी पद्धतीने केली जाणार असल्याची घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी विधान परिषदेत केली आहे. या निर्णयामुळे शाळांमध्ये शिपाई आणि इतर सहाय्यक पदांसाठी पारंपरिक कायमस्वरूपी भरतीऐवजी कंत्राटी पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे फक्त शिपाई नाही तर सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतील. या निर्णयापासून जे कर्मचारी आता कार्यरत आहेत, ते निवृत्त होईपर्यंत राहतील. पण त्यांची जागा रिक्त झाल्यावर त्यापुढे त्यांच्या जागेवर कंत्राटी कर्मचारी भरती केले जाणार, अशी माहिती शिक्षण मंत्री भुसे यांनी दिली.

**विरोधकांकडून जोरदार आक्षेप**

दरम्यान दादा भुसे यांनी केलेल्या घोषणेमुळे विधानपरिषदेत चांगलाच गदारोळ झाला. विरोधकांनी शाळांमध्ये शिपाई यांची भरती कायमस्वरूपी झाली पाहिजे अशी मागणी करत विरोधकांकडून हा जोरदार मुद्दा लावून धरला. तसेच शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे, अशी मागणी केली. अनेक शाळामंध्ये जास्त मुली शिक्षण घेत असतात. त्यामुळे त्याच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यामुळे कायमस्वरुपी भरती झाली पाहिजे.

## लोकशाही हा आमचा संस्कार

### पंतप्रधान मोदींचे घानाच्या संसदेत संबोधन : घानाचा राष्ट्रीय सन्मान प्रदान



### मोदींसमोर मुलांनी गायले 'हरे राम हरे कृष्ण'

**पंतप्रधान मोदी घानाची राजधानी अक्रा येथे पोहोचल्यावर त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली. त्यांच्यासमोर लहान मुलांच्या गटाने 'हरे राम हरे कृष्ण' हे गीत गायले. याशिवाय तेथे पारंपारिक वाद्ये वाजवण्यात आली. घानामधील भारतीय समुदायाच्या लोकांनीही मोदींचे हार्दिक स्वागत केले. नंतर, पंतप्रधानांनी इंस्टाग्रामवर पोस्ट केले की, घानाच्या अक्रा येथे पोहोचलो. राष्ट्रपती जॉन ड्रामानी महामा यांच्या सौजन्यपूर्ण स्वागताने मला सन्मानित वाटत आहे. दोन्ही देश एकत्रितपणे त्यांचे दीर्घकालीन संबंध मजबूत करण्याची आणि सहकायार्चे नवीन मार्ग शोधण्याची आशा करत आहेत.**

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारत लोकशाहीची जननी आहे. भारतासाठी लोकशाही ही व्यवस्था नाही तर संस्कार आहे. भारतात २ हजार ५०० राजकीय पक्ष आहेत. २० वेगवेगळे पक्ष वेगवेगळ्या राज्यात सरकार चालवत आहेत. यामुळेच भारतात येणाऱ्या लोकांचे भारतात भव्य स्वागत केले जाते. चहामध्ये साखर मिसळली जाते तशी घानामध्ये भारतातील लोक मिसळलेले आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. घानाच्या संसदेला त्यांनी संबोधित केले. हा काळ युद्धाचा नाही. संवाद आणि राजनयिकतेने समस्या सोडविण्याची साद मोदींनी जगाला घातली.

बुधवारी रात्री पश्चिम आफ्रिकी देश घाना येथे पोहोचल्यानंतर पंतप्रधान मोदींनी घानाचे अध्यक्ष जॉन ड्रामानी महामा यांच्याशी चर्चा केली. यावेळी मोदी आणि महामा यांच्यात अनेक मुद्यांवर चर्चा झाली. यादरम्यान, भारत आणि घाना यांच्यात चार करारांवर स्वाक्षरीही झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी या ंना 'ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ घाना' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल पंतप्रधान मोदी म्हणाले की, घानाच्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित होणे ही माझ्यासाठी खूप अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे. मी राष्ट्रपती महामा, घाना सरकार आणि घानाच्या लोकांचे मनापासून आभार मानतो.

## संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होईल आणि २१ ऑगस्टपर्यंत चालेल. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली. संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मान्यता दिली आहे. ना. रिजिजू यांनी एक्स वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २१ जुलै ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संसदेचे पावसाळी अधिवेशन घेण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर १३ आणि १४ ऑगस्ट रोजी संसदेची बैठक होणार नाही. पूर्वी हे अधिवेशन १२ ऑगस्ट रोजी संपणार होते. परंतु आता ते एका आठवड्यासाठी वाढविण्यात आले आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर संसदेचे पहिले अधिवेशन असेल.

## घरात घुसून तरुणीवर डिलिव्हरी बॉयचा अत्याचार

### आरोपीने बलात्कारानंतर पीडितेसोबत सेल्फी काढला



**वृत्तसंस्था/पुणे**

पुणे शहरातील कोंढवा भागातील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणीच्या तोंडावर स्प्रे मारून डिलिव्हरी बॉयने तिच्याच घरात बलात्कार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. आरोपीने महिलेवर बलात्कार केल्यानंतर तिच्या सोबत सेल्फी काढल्याची माहिती समोर येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोंढवा भागातील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये बुधवारी रात्री साडेसातच्या सुमारास डिलिव्हरी बॉय असल्याचे सांगून सोसायटीमध्ये प्रवेश केला. त्या सोसायटीमधील एका फ्लॅटमध्ये आरोपी गेला आणि तुमचे कुरिअर आल्याचे पीडित तरुणीला म्हणाला. परतुं, तरुणीने हे कुरिअर आपले नसल्याचे सांगितले. तरीही तुम्हाला सही करावी लागेल, असे आरोपीने सांगितले. त्यामुळे पीडित तरुणीने सेफ्टी डोअर उघडले.

त्याचवेळी आरोपीने पीडित तरुणीच्या तोडांवर स्प्रे मारला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या घटनेनंतर आरोपीने तिच्याच मोबाईलने सेल्फी काढत 'परत येईल', असे टाईप करून ठेवले, अशी घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच या प्रकरणातील आरोपीच्या शोधासाठी पाच पथके रवाना करण्यात आली आहेत.

## प्रत्येक भारतीय पावणेपाच लाखांनी कर्जबाजारी

### रिझर्व्ह बँकेच्या अहवालाने खळबळ

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

प्रत्येक भारतीय पावणेपाच लाखांनी कर्जबाजारी आहे. या रिझर्व्ह बँकेच्या नवीन अहवालाने खळबळ माजवली आहे. गेल्या दोन वर्षांत प्रत्येक भारतीयाचे भांडवली कर्ज प्रचंड वाढले आहे. हे कर्ज दोन वर्षांत ९० हजार रुपयांनी वाढून ४ लाख ८० हजार रुपये झाले आहे.



यावर काँग्रेसने मोदी सरकारविरुद्ध हल्लाबोल केला आहे. सर्व सरकारी प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागीदारीद्वारे केले जातात की खाजगी भागीदारीद्वारे, पण देशाचे कर्ज का वाढत आहे असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे. काँग्रेसचे मीडिया प्रमुख जयराम रमेश यांनी म्हटले आहे की, गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. लोकांचे जीवन सुधारण्याऐवजी, धोरणे हे केवळ उद्योगपती मित्रांसाठी तयार केले गेले. यामुळे होणारे नुकसान हे देशातील जनतेचे मोठे नुकसान आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या बातम्यांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल चिंता निर्माण करणारे चित्र समोर आले आहे. सरकारकडून आकडेवारीचा खेळ करून आणि तज्ञांची मदत घेऊन मूळ गूढ लपविण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण मोदी राजवटीत देशावरील कजार्चा बोजा वाढला आहे हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही, असे रमेश म्हणाले आहेत. गेल्या २ वर्षांत देशातील प्रति व्यक्ती कर्ज ९० हजार रुपयांनी वाढून ४.८ लाख रुपये झाले आहे.

## फक्त दलाई लामाच त्यांचा उत्तराधिकारी ठरवू शकतात

### भारताने चीनला दिली योग्य पद्धतीने समज

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

'फक्त तिबेटी आध्यात्मिक नेते दलाई लामाच त्यांच्या उत्तराधिकाऱ्याबाबत निर्णय घेऊ शकतात', असे भारताने चीनला स्पष्ट शब्दात सांगितले आहे. भारताने आज गुरुवारी शेजारील देशाला सांगताना, त्यांनी दलाई लामा यांच्या पुनर्जन्माला मान्यता द्यावी, असे म्हटले आहे.

दलाई लामा यांनी नुकतेच स्थापन केलेल्या गादेन फोडरंग ट्रस्टला त्यांचा पुनर्जन्म ओळखण्याचा अधिकार आहे. परंतु दुसरीकडे चीन दलाई लामांचा उत्तराधिकारी निवडेल, असा आग्रह धरत आहे. मात्र, १४ व्या दलाई लामांनी स्पष्टपणे सांगितले होते की, या प्रकरणात कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. केंद्रीय



अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले की, दलाई लामा यांचे स्थान केवळ तिबेटी लोकांसाठीच नाही तर जगभरातील त्यांच्या सर्व अनुयायांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांचा उत्तराधिकारी ठरवण्याचा अधिकार पूर्णपणे दलाई लामांचा आहे.

भारताने असेही म्हटले आहे की केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि राजीव रंजन सिंह रविवारी १४ व्या दलाई लामा यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या समारंभात सहभागी होतील. भविष्यातील दलाई लामा यांना मान्यता देण्याची प्रक्रिया २४ सप्टेंबर २०११ च्या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे, असे दलाई लामा यांच्या कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे. त्यात म्हटले आहे की असे करण्याची जबाबदारी केवळ गादेन फोडरंग ट्रस्टच्या सदस्यांवर असेल. मात्र चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग म्हणाले की, दलाई लामा यांच्या उत्तराधिकारीची निवड चीनच्या सीमेत त्यांच्या देखरेखीखाली झाली पाहिजे. चीनची ही बऱ्याच काळापासूनची भूमिका आहे.

## आता बार्टी, सारथी, महाज्योतीत गुणवत्तेवर प्रवेश

**वृत्तसंस्था/मुंबई**

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार असून या संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबविण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत दिली.



विधान परिषद सदस्य संजय खोडके, अभिजीत वंजारी यांनी छ्यत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेकडून (सारथी) घरभाडे भत्ता आणि आकस्मितता निधी वितरणाबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सारथी संस्थेमध्ये २०१८ ते २५ या कालावधीत ८३ अभ्यासक्रमांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांना शासनामार्फत विद्यावेतन, शिष्यवृत्ती आदी लाभ देण्यात आले. त्यापैकी ३ हजार म्हणजे केवळ एक टक्का विद्यार्थ्यांनी पीएचडी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला होता. त्या एक टक्का विद्यार्थ्यांसाठी २८० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला.




**भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल याने इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात द्विशतक झळकावले आहे. या द्विशतकी खेळीच्या जोरावर गिलने एक खास इतिहास रचला आहे. बर्मिंगहॅमच्या मैदानावर गिलने ३११ चेंडूंमध्ये आपले द्विशतक पूर्ण केले. हे गिलचे कसोटी कारकीर्दीतील पहिले द्विशतक आहे. त्याने ३० चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने २६९ धावांची खेळी साकारली.**

## भारताच्या त्रपित बन्सल यांना मेटाकडून ८०० कोटींची ऑफर?

### ओपन एआयमधून येण्यासाठी सायनिंग बोनस देणार

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

आयआयटी कानपूरचा माजी विद्यार्थी आणि ओपन एआय कंपनीमधील संशोधक त्रपित बन्सल हे आता मेटाच्या अत्याधुनिक सुपर इंटेलिजन्स लॅबमध्ये सामील झाले आहेत. त्यांच्या या ऐतिहासिक नियुक्तीने केवळ भारतीय संशोधकांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील पतच वाढवली नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात भारताच्या सहभागालाही नवे वळण दिले आहे.

प्रसारमाध्यमातील काही वृत्तांनुसार, मेटा आता एआय क्षेत्रातील सर्वोच्च प्रतिभावतांना आकर्षित करण्यासाठी १०० ते ३०० मिलियन डॉलर (भारतीय रुपयात अंदाजे ८०० कोटींपर्यंत)चा साइनिंग बोनस देत आहे. बन्सल



यांच्या ऑफरचे अचूक तपशील जाहीर झालेले नाहीत. परंतु त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्टॉक ऑप्शन्स आणि अत्याधुनिक कम्प्युट ॲक्सेस समाविष्ट असण्याची शक्यता आहे.

त्रपित बन्सल हे आयआयटी कानपूरचे पदवीधर असून त्यांनी गणित आणि सांख्यिकी या विषयांतून दुहेरी पदवी घेतली आहे.

### एआयच्या शर्यतीत भारताची छाप

**त्रपित बन्सल यांची मेटामध्ये निवड केवळ त्यांची वैयक्तिक कामगिरीच दर्शवत नाही, तर भारतातील अकसंशोधनाची गुणवत्ता आणि संभाव्यता सिद्ध करते. अशा निवडींमुळे भारतीय तरुण संशोधकांमध्ये नवचैतन्य निर्माण होणार आहे, आणि भारताला जागतिक अकक्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळवून देण्याची क्षमता वाढणार आहे. बन्सल यांचा मेटाच्या एआय सुपरइंटेलिजन्स टीममध्ये प्रवेशामुळे त्यांच्या सखोल ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ मेटाच्या एजीआय डिव्हिजनसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. हा टप्पा केवळ एका आयआयटीयनचा वैयक्तिक विजय नसून, जागतिक पातळीवर भारताच्या वैज्ञानिक सामर्थ्याचे प्रतीक ठरणार आहे.**

त्यानंतर त्यांनी यूमास ॲमर्हस्ट येथून संगणक विज्ञानात पीएच.डी. पूर्ण केली, ज्यामध्ये त्यांनी मेटा लर्निंग, डीप लर्निंग आणि नॅचरल लँग्वेज या क्षेत्रांवर संशोधन केले.

बन्सल यांचा प्रवास एका सामान्य सल्लागार कंपनीपासून सुरू झाला. २०१२मध्ये ते ॲसेंचरमध्ये विश्लेषक होते. त्यानंतर आयआयएससी बंगळुरूमध्ये त्यांनी संशोधन सहाय्यक म्हणून बायेसिएन मॉडेलिंग आणि अनुमान पद्धतींवर काम केले. पुढे फेसबुक, गुगल, मायक्रोसॉफ्ट आणि ओपन एआयसारख्या कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करत त्यांनी स्वतःला एआय संशोधनात झोकून दिले.

२०२२मध्ये त्रपित बन्सल डस्त्रील्लअकमध्ये पूर्णवेळ कर्मचारी म्हणून रुजू झाले. त्यांनी संस्थापक इलिया सुत्स्केवर यांच्यासोबत रिइन्फोर्समेंट लर्निंग आधारित रिझनिंग मॉडेल्स विकसित केली. याच संशोधनामुळे ओपन एआयचे अत्यंत लोकप्रिय रिझनिंग एनेबल्ड मॉडेल '०१' अस्तित्वात आले, जे चॅटजीटीपीच्या अंतर्गत लॉजिक सिस्टमचा गाभा मानले जाते.

मेटा (पूर्वीचे फेसबुक)ने आपल्या नवीन सुपरइंटेलिजन्स लॅब्सचे उद्घाटन नुकतेच केले. हे डिव्हिजन मार्क झकरबर्ग यांच्या एजीआय-आर्टिफिशिअल जनरेटिव्ह इंटेलिजन्स- निर्माणाच्या महत्वाकांक्षी योजनेचा भाग आहे. ही लॅब स्केल एआयचे माजी सीईओ अलेक्झांडर वांग आणि गीटहबचे माजी सीईओ नॅट फ्रीडमन यांच्या नेतृत्वाखाली चालवली जाते.

ओपन एआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनीही यापूर्वी मेटावर आरोप केला होता की ते ओपन एआयमधील सर्वोच्च संशोधकांना १०० मिलियन डॉलर्सपर्यंतचे ऑफर्स दिली जात आहे. बन्सल यांच्यासारख्या संशोधकांच्या बाहेर पडण्यामुळे या दाव्यांना वजन मिळत आहे.


## माली देशात तीन भारतीयांचे अपहरण

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

आफ्रिकन देश मालीमध्ये तीन भारतीय नागरिकांचे अपहरण झाल्याचे वृत्त आहे. भारत सरकारने या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे आणि अपहरण केलेल्या भारतीयांच्या सुरक्षित व लवकर सुटकेसाठी माली सरकारने सर्व शक्य पावले उचलण्याची मागणी केली आहे.

या घटनेत अल-कायदाचा हात असण्याची भीती आहे. तथापि, अद्याप कोणत्याही संघटनेने याची जबाबदारी घेतलेली नाही. ही घटना मालीच्या कायेस शहरातील डायमंड सिमेंट कारखान्यात घडली. सशस्त्र हल्लेखोरांनी या कारखान्यावर हल्ला केला आणि तीन भारतीयांना ओलीस ठेवले.

### विनम्र अभिवादन



स्वामी विवकानंद यांची आज पुण्यतिथी

## आदित्य ठाकरेंना क्लीनचिट!


**मुंबई :** अभिनेता सुशांतसिंह



राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनने आत्महत्या केली आहे आणि तिच्या मृत्यूमध्ये कोणताही गुन्हा आढळला नाही, असे प्रतिज्ञापत्र मुंबई पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयात सादर केले आहे. या प्रकरणात माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्यावर मोठ्या प्रमाणात आरोप झाले होते. मात्र, आता पोलिसांनी दाखल केलेला प्रतिज्ञापत्रानंतर आदित्य ठाकरे यांना क्लीन चिट मिळाली आहे. (वृत्त पान ६)

## मला अनुभव नाही म्हणणे अज्ञानमूलक -नरेंद्र जाधव

**पुणे :** भारतीय नियोजन आयोगाचा सदस्य असताना माझ्याकडे शिक्षण, कामगार,



रोजगार, कौशल्य, सामाजिक न्याय अशा अनेक विभागांवर मी काम केले आहे. संपूर्ण देशातील शिक्षणाचे काम पाहत होतो. नवीन शैक्षणिक धोरणावर मी काम केलेले आहे. त्यामुळे मला शिक्षण क्षेत्राचा अनुभव नाही, असे म्हणणे, हे संपूर्णपणे अज्ञानमूलक आहे, अशी भूमिका त्रिभाषा समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी स्पष्ट केली.त्रिभाषा सूत्राचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आल्यानंतर डॉ. जाधव यांनी माध्यमांशी संवाद साधला. पत्रकारांशी बोलताना डॉ. जाधव म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट झालेली नाही. आमचा केवळ फोनवरून संवाद झाला. माझी संमती सांगितल्यानंतरच अध्यक्षाच्या नावाची घोषणा करण्यात आली. समितीत अनेक लोक असणार आहेत. तीन महिने हातात आहेत. माशेलकर समितीच्या अहवालाचा अभ्यास करणार आहोत. विरोध करणाऱ्या नेत्यांची बाजू समजून घेऊन अहवाल तयार करणार आहोत. अजून खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली नाही. मराठीला प्राधान्य असायला हवे, असे त्यांनी म्हटले.

### सोने चांदी

| | |
|---|---|
| सोने | ९८,४००/- |
| चांदी | १,१०,०००/- |

* सोने-२४ कॅरेटचे दर, चांदी प्रती किलो

### तापमान

| शहर | कमाल / किमान |
|---|---|
| नागपूर | ३१.४ / २५.० |
| वाशीम | ३०.४ / २२.४ |
| अकोला | ३२.९ / २४.७ |
| बुलडाणा | २८.८ / २२.० |
| अमरावती | ३१.२ / २२.८ |
| यवतमाळ | २९.४ / २३.२ |
| वर्धा | ३१.५ / २४.६ |
| चंद्रपूर | ३२.० / २४.४ |
| गडचिरोली | २८.० / २३.६ |
| भंडारा | २९.४ / २३.० |
| गोंदिया | २८.६ / २४.४ |

# २४ तास वाळू वाहतुकीला परवानगी

## ■ महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती
## ■ घरकुलांसाठी मोफत वाळू वितरणाचीही हमी

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यात वाळू वाहतुकीसंदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला निर्णय अखेर घेण्यात आला असून, सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता २४ तास करता येणार आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत नियम ४७ अंतर्गत निवेदन सादर करत केली.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक



वाढते. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### चंद्रपूरमध्ये १०० कोटी रॉयल्टी प्राप्त

**मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, घरकुल योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला ५ ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. एनजीटीच्या अटीमुळे १० जूननंतर काही घाटांवर मर्यादा आल्या असल्या तरी ज्या ठिकाणी पर्यावरण परवानगी आवश्यक नाही अशा घाटांवरून घरकुलांना वाळूचा पुरवठा थांबवण्यात येणार नाही. नवीन वाळू धोरणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील पहिल्या निविदेतूनच राज्याला १०० कोटी रॉयल्टी मिळाली आहे. हे धोरण अर्थसंकल्पीय दृष्टिकोनातूनही राज्यासाठी लाभदायक ठरणार आहे, असेही ते म्हणाले.**

वाहतुकीच्या पारदर्शकतेसाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या असून, प्रत्येक वाळूघाटाचे जिओ-फेन्सिंग केले जाणार आहे. घाट व मार्गांवर सीसीटीव्ही बसवले जाणार, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस डिव्हाइस अनिवार्य करण्यात येणार

राज्यात नैसर्गिक वाळूची मर्यादा लक्षात घेऊन, शासनाने कृत्रिम वाळू धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स उभारण्यात येणार असून त्यासाठी ५ एकर जमीन दिली जाणार आहे. तीन महिन्यांत १००० क्रशर युनिट्स सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे.

नवीन वाळू धोरणावर सभागृहात चर्चा व्हावी अशी सदस्यांची मागणी मान्य करत, ते म्हणाले की, आपण या धोरणावर कोणत्याही वेळी चर्चा करण्यास तयार आहोत. जनतेकडून आलेल्या १२००हून अधिक सूचना विचारात घेऊन अंतिम धोरण निश्चित करण्यात आले आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# चंद्रपुरातील प्रदूषण नियंत्रणासाठी सरकार कटिबद्ध

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची ग्वाही



**वृत्तसंस्था/मुंबई**

चंद्रपूर परिसरातील औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा खाणी व स्टील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या प्रश्नावर शासन जागरूक असून विविध उपाययोजना राबवण्यात येत आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत दिली.

अर्धा तास चर्चेदरम्यान उपस्थित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या. मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, चंद्रपूर परिसर २०१० मध्ये 'क्रिटिकली पॉल्युटेड एरिया' (सीपीए) म्हणून नोंदवलेला होता, मात्र विविध उपायांमुळे प्रदूषण निर्देशांक ८३ वरून ५४वर आला आहे. यामुळे काही उद्योगांना अटींवर परवानग्या देण्यात आल्या आहेत.

प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर), डस्ट कलेक्टर, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम, जलप्रदूषण नियंत्रणासाठी ट्रीटमेंट प्लांट, पाण्याचा पुनर्वापर, रस्त्यांचे पक्कीकरण व फवारणीसारख्या अटी बंधनकारक करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य शासन वेळोवेळी उद्योगांना नोटिसा देऊन तपासणी करीत आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रदूषण नियंत्रणासाठी निधीही वितरित करण्यात आला आहे. मात्र काही ठिकाणी निधी खर्चात अंमलबजावणी कमी असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले. चंद्रपूरसारख्या प्रदूषण क्लस्टर असलेल्या भागासाठी स्वतंत्र प्रदूषण नियंत्रण आराखडा तयार करण्याची सरकारची सकारात्मक भूमिका असून लवकरच त्यावर निर्णय घेतला जाईल, असेही मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

# सहकार पॅनलचे २१ उमेदवार जाहीर

## राज्य सहकारी संघ निवडणूक

**वृत्तसंस्था/मुंबई**

भाजपा गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर, सहकारातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे, संजीव कुसाळकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सहकारी राज्य संघाच्या संचालक निवडणुकीसाठी 'सहकार पॅनल'चे २१ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत.

जाहीर झालेल्या २१ उमेदवारांत प्रकाश दरेकर (राज्यस्तरीय संघीय सहकारी संघ प्रतिनिधी), हिरामण सातकर (पुणे विभाग), धनंजय कदम (शेडगे) (कोल्हापूर विभाग), प्रवीण दरेकर (मुंबई विभाग), अरूण पानसरे (कोकण विभाग), गुलाबराव मगर (औरंगाबाद विभाग), वसंत पाटील (लातूर विभाग), प्रकाश भिशीकर (नागपूर विभाग), अशोक जगताप (विभागीय सहकारी संघ प्रतिनिधी), नाशिक व अमरावती विभाग निरंक, संजीव कुसाळकर (इतर संस्था प्रतिनिधी), रामदास मोरे (इतर संस्था प्रतिनिधी), नितीन बनकर (इतर संस्था प्रतिनिधी), सुनील जाधव पाटील (इतर संस्था प्रतिनिधी), नंदकुमार काटकर (इतर संस्था प्रतिनिधी), विष्णू घुमरे (अनुसूचित जाती/जमाती प्रतिनिधी), अनिल गजरे (भटक्या विमुक्त जाती जमाती प्रतिनिधी), अर्जुनराव बोरुडे (इतर मागासवर्गीय प्रवर्ग प्रतिनिधी), जयश्री पांचाळ (महिला प्रतिनिधी), दीपश्री नलावडे (महिला प्रतिनिधी) यांची नावे आहेत. दरम्यान, सहकार क्षेत्रात अनुभवी नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या आ. प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली हा पॅनल निवडणूक लढवत असून, त्यांच्या कार्यकुशलतेमुळे सहकारी संस्था अधिक सक्षम होतील, असा विश्वास सहकार क्षेत्रातील नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे.

# खासगी सुरक्षा रक्षकाबाबत तपासणी करणार

**मुंबई :** आस्थापनांनी खासगी सुरक्षा रक्षकांना द्यावयाच्या लाभाबाबत जिल्हानिहाय तपासणी मोहीम राबविण्यात येईल, असे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.खासगी सुरक्षा रक्षकांच्या हक्काबाबत सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये किशोर जोरगेवार, महेश शिंदे, प्रशांत बंब, सुलभा गायकवाड यांनी सहभाग घेतला.कामगार मंत्री फुंडकर म्हणाले की, महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ अंतर्गत, तसेच इतर कामगार कायद्यातील तरतुदीनुसार सुरक्षा रक्षकांना असणारे सर्व लाभ या आस्थापनांनी अदा करणे बंधनकारक आहे. मात्र सुरक्षा मंडळात नोंदीत नसलेल्या आस्थापना खासगी सुरक्षा रक्षकांना लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत.

# शिंदेंच्या मंत्र्यांकडून उद्धव ठाकरेंना जेवणाचे निमंत्रण

## हिंदी सक्तीच्या पार्श्वभूमीवर चर्चेला उधाण

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्य विधिमंडळाचे सध्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विविध पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांकडून आपापल्या आमदारांना जेवणाचे निमंत्रण दिले जात आहे. प्रत्येक पक्षात डिनर डिप्लोमसी पार पडत आहे. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी शिवसेना (ठाकरे)चे पक्रमुख उद्धव ठाकरे यांनाच जेवनाचे निमंत्रण दिले आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना एका वृत्त वाहिनीच्या पत्रकाराने ठाकरे गटाला जेवणाचे निमंत्रण द्याल का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी जेवणाचे निमंत्रण ठाकरे गटाला दिल्याचे सांगितले. त्यावर त्याच वाहिनीच्या पत्रकाराने ठाकरे गटाचे सुनील प्रभू यांना निमंत्रण स्वीकारणार का? असा प्रश्न विचारला असता, वैयक्तिक मैत्रीमुळे व माणुसकीमुळे आपण निमंत्रण स्वीकारणार, असे ते म्हणाले.

शिंदेंच्या मंत्र्यांकडून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनादेखील जेवणाचं निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच आमदार सुनील प्रभू यांना देखील जेवणाचे निमंत्रण देण्यात आले आहे. मैत्री जपायची असते. राजकारणात उद्या काय होईल ते सांगता येत नसते, अशी प्रतिक्रिया मंत्री सरनाईक यांनी दिली. सरनाईक पुढे म्हणाले की, राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत नाही. राजकारणात कोणी कुणाचा कायमचा शत्रू नसतो आणि कुणी कुणाचा कायमचा मित्रही नसतो. त्यामुळे उद्या काय होईल, हे आज मी तरी सांगू शकणार नाही. मला असे वाटते, या पृथ्वीतलावर देवालाही सांगता येणार नाही की, राजकारणात उद्या काय होईल? जेवनाचे पक्षाच्या नेत्यांपासून, विरोधी पक्ष सगळ्यांना निमंत्रण देईन, असे ते म्हणाले.

# अग्निसुरक्षेचे निकष न पाळल्यास मॉल्सची वीज तोडणार -ना. सामंत

**मुंबई :** मुंबईतील लिंक स्क्वेअर मॉल (२९ एप्रिल २०२५) व ड्रीम मॉलमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने फायर ऑडिटसंदर्भात कडक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व मॉल्सचे ९० दिवसांत फायर ऑडिट पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित महापालिकांना दिले जातील. तसेच जे मॉल अग्निसुरक्षेचे निकष पूर्ण करणार नाहीत त्यांची वीज आणि पाणी जोडणी तोडण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती विधानपरिषदेत उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी दिली.सदस्य कृपाल तुमाने यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. मंत्री सामंत म्हणाले की, मुंबई महापालिकेने याबाबत आधीच कारवाई सुरू केली असून, ड्रीम मॉल सध्या बंद आहे. फायर सेफ्टीसंदर्भात यापुढे कोणताही निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही.

# निधी मिळत नसल्याने परिणय फुके नाराज

## महायुतीत आमदार नाराजीचे सत्र सुरूच

**वृत्तसंस्था/मुंबई**

महायुती सरकारमध्ये विरोधी पक्षाच्या आमदारांना निधी मिळत नसल्याची तक्रार केली जात होती. मात्र आता महायुतीच्या आमदाराची निधी मिळत नसल्याची तक्रार समोर आली आहे. भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद आमदार परिणय फुके यांनी भर सभागृहातच निधी मिळत नसल्याची नाराजी व्यक्त केली. जिल्हा नियोजन निधीतून परिषद आमदारांना निधी द्यायचा नाही असा निर्णय झाला.

हा आमच्यावर दुजाभाव असून आमदार निधीही दिला जात नाही अशी तक्रार ही सभापतिकडे केली आहे. विधान परिषदेत महत्त्वाच्या विषयावर बोलताना एकही मंत्री आणि नोटिंगसाठी अधिकारी उपस्थित राहत नाही असा आरोप ही फुके यांनी केला आहे. विधान परिषदेत येऊन चूक केली आहे अशी खंत ही फुके यांनी व्यक्त केली. यामुळे भाजप प्रणीत महायुतीमध्ये आमदार नाराजीचे सत्र सुरूच आहे.

विधान परिषद आमदारांना हलक्यात घेतले जात आहे. जिल्हा नियोजनात निधी मिळत नाही. मी या सभागृहात येऊन चूक केली, विधानसभा लढवायला हवी होती अशी खंत परिणय फुके यांनी व्यक्त केली. आता आपण आपापल्या पक्षासाठी लढण्याऐवजी सर्वांनी आपल्या अधिकारांसाठी लढले पाहिजे, या सभागृहाच्या सन्मानासाठी बोलले पाहिजे. सभागृहाने याबाबत कठोर कारवाई करावी, अशी मागणी फुके यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडे केली आहे. दरम्यान, हा विषय गटनेत्यांच्या चर्चेत मांडून सभागृहात यावर चर्चा घेऊ. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामकाजमंत्र्यांशी बोलू, असे आश्वासन उपसभापती गोऱ्हे यांनी दिले आहे.

# भौगोलिक परिस्थितीनुसार कृषिपंप देण्याचा विचार

## ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची माहिती

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्य शासनाने सौर ऊर्जेवर आधारित कृषिपंप देण्यावर भर दिला आहे. मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार सौरपंप देणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी पारंपरिक कृषिपंप देण्याबाबत शासन विचार करेल. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांना वीज जोडणी देण्यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशातील ५० टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतांतून निर्मित करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. त्याला अनुसरून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यातही सौर ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन दिले असून मागेल त्याला सौरपंप देण्याची योजना सुरू केली आहे. विशेष म्हणजे सौर पंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यात सी.आर.आय. कंपनीमार्फत लावण्यात आलेल्या सौर कृषी पंपांबाबत आलेल्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कंपनीला १३ लाखाचा दंडही करण्यात आला असल्याचेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी यावेळी सांगितले. या कंपनीच्या सौर कृषी पंपांबाबत १८३ शेतकऱ्यांनी ५४४ तक्रारी नोंदवल्या होत्या. यातील ५४२ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून, उर्वरित दोन तक्रारी पाण्याचा स्त्रोत कोरडा झाल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. जिथे पाण्याची पातळी खालावली आहे, अशा ठिकाणी बुस्टर पंप बसवून नदी किंवा जलस्त्रोतांमधून शेतापर्यंत पाणी पोचविण्यात येत आहे, असेही राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले.

# कनिष्ठ सहाय्यक पदोन्नती प्रक्रिया २६ जिल्ह्यांत पूर्ण - गोरे

**वृत्तसंस्था/मुंबई**



कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नती व अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संदर्भात ४०:५०:१० या प्रमाणानुसार सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार २६ जिल्हा परिषदांमध्ये प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत दिली.

अर्धा तास चर्चेदरम्यान उपस्थित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री गोरे बोलत होते. पाच जिल्हा परिषदांमध्ये ही प्रक्रिया सुरू असून ती येत्या तीन महिन्यांत पूर्ण केली जाईल उर्वरित तीन जिल्हा परिषदांमध्ये सरळ सेवा भरतीमुळे पदोन्नती शक्य नाही, सर्व पात्र कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी ग्रामविकास विभाग बारकाईने कार्यवाही करत असल्याचेही मंत्री गोरे यांनी सांगितले.

# पोलिसांच्या घरांच्या प्रश्नावर ठोस भूमिका घेणार का?

## भाजपचे आ. प्रवीण दरेकर यांची विचारणा

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबईतील पोलिसांच्या घरांचा प्रश्न अत्यंत दयनीय, बिकट आहे. जे पोलिस आपल्या संरक्षणाची काळजी घेतात तेही सुस्थितीत राहावे ही आपली जबाबदारी आहे. मुख्यमंत्र्यांचे पोलिसांवर विशेष लक्ष आहे. त्यामुळे राज्य सरकार पोलिसांच्या घरांबाबत भूमिका घेईल का?, असा सवाल भाजपा गटनेते आ. प्रवीण दरेकर यांनी प्रश्नोत्तराच्या चर्चेवेळी उपस्थित केला.

सभागृहात बोलताना आ. दरेकर म्हणाले की, पोलिसांना व्यायाम शाळा, आरोग्य सुविधा देणार त्या पुरेशा आहेतच. परंतु पोलीस, पोलीस अधिकारी यांचे मानसिक संतुलन बिघडते त्यातून आत्महत्येसारख्या घटना घडतात. हा मानसिकतेशी संबंधित विषय आहे. याबाबत समुपदेशनही केले जाते. पोलिसांचे मानसिक संतुलन बिघडणार नाही अशा प्रकारचे समुपदेशन शासन करण्याबाबत ठोस भूमिका घेईल



का? बदल्यांचा विषय बऱ्यापैकी मार्गी लागतोय. त्यामुळे पोलिसांत चांगल्या प्रकारचे बदल होताना दिसताहेत. त्याचबरोबर पोलिसांना मोठ्या प्रमाणावर घरे देताय. परंतु मुंबईतील पोलिसांच्या घरांचा प्रश्न अत्यंत दयनीय, बिकट आहे.

आजही पोलिस वसाहतीत स्लॅप कोसळताहेत, छप्पर गळतेय. शिवडी, नायगाव येथील पोलीस वसाहतीत खरोखर दयनीय अवस्था आहे. जे पोलीस आपल्या संरक्षणाची काळजी घेतात तेही सुस्थितीत राहावे ही आपली जबाबदारी आहे. मुख्यमंत्र्यांचे पोलिसांवर विशेष लक्ष आहे. पोलिसांना त्याच ठिकाणी घरे देता येतील का? हाही त्यांच्या मानसिकतेशी संबंधित प्रश्न आहे. पोलिसांच्या घरांसंबंधी शासन भूमिका घेऊन गती घेईल का? असा सवाल दरेकर यांनी केला.

दरेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पोलिसांची मानसिक अवस्था अनेकदा होते त्याप्रकरणी समुपदेशन झाले पाहिजे. ४० वर्षांवरील जेवढे पोलिस आहेत त्यांना वर्षातून एकदा तपासणी अनिवार्य आणि ५० वर्षांच्यावर जे पोलिस आहेत त्यांना वर्षातून दोनदा तपासणी अनिवार्य करण्याचा नियम केला आहे. त्याचबरोबर सर्व युनिट कमांडर्सनी प्रत्येक मंगळवारी आणि शुक्रवारी किमान दोन तास आपल्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधायला सांगितलेय.

# पोंभुर्णा एमआयडीसीसाठी ६० दिवसांत भूसंपादन - इंद्रनील नाईक

**वृत्तसंस्था/मुंबई**

चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णामधील कोसंबीपेठ येथे औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत शासन सकारात्मक आहे. या औद्योगिक वसाहतीसाठी १०२.५० हेक्टर जमिनीची आवश्यकता असून संपादनासाठी ६ कोटी ७ लाख ५२ हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यापैकी ४२.५९ हेक्टर जमीन संपादनाला थेट खरेदीद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित भूसंपादन प्रक्रिया ६० दिवसांत पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी आज गुरुवारी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

पोंभुर्णा औद्योगिक वसाहतीसाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देणेबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेच्या उत्तरात राज्यमंत्री नाईक म्हणाले, थेट खरेदीद्वारे मान्यता दिलेला ४२.५९ हेक्टर जमिनीसाठी २५ शेतकऱ्यांना २ कोटी ३५ लक्ष रुपयांचा मोबदला देण्यात आलेला आहे. तसेच १९ शेतकऱ्यांना मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याचप्रमाणे ३४.३८ हेक्टर जमिनीचा निवडा स्तरावर असून याच वर्षी ही जमीन संपादित करण्यात येणार आहे.


पोंभुर्णा औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत अधिवेशन काळातच संबंधित विभागाची बैठक आयोजित करण्यात येईल. तसेच या औद्योगिक वसाहतीची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी दौराही करण्यात येईल, असेही उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी सांगितले.

# शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न - दादा भुसे

**वृत्तसंस्था/मुंबई**

शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवत आहे. यू-डायस प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेला उत्तर देताना मंत्री भुसे बोलत होते. मंत्री भुसे म्हणाले की, अनेक विद्यार्थी दहावीनंतर आयटीआय, डिप्लोमा आदी अभ्यासक्रमांकडे वळतात. मात्र, त्यांच्या शाळेतील रेकॉर्ड अद्ययावत होत नसल्यामुळे ते



'ड्रॉपआउट' म्हणून नोंदविले जातात. राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलै दरम्यान विशेष मोहिम राबवली जात आहे. आधार लिंकिंग आणि अपार आयडी (विद्यार्थ्यांसाठी युनिक कोड) यामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवास ट्रॅक केला जाणार आहे. सध्या राज्यात ८६ टक्के विद्यार्थ्यांचा डेटा संकलित झालेला असून ९५ टक्के आधार लिंकिंग पूर्ण झाले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

मंत्री भुसे म्हणाले की, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार, स्वच्छ शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, आणि खेळांची सुविधा यासाठी विशेष भर दिला जात आहे. आतापर्यंत ९ हजार उच्चशिक्षित शिक्षक नियुक्त झाले असून आणखी १० हजार भरती प्रक्रियेत आहेत. मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. या कामात सर्व जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले.

# वारकऱ्यांना 'अर्बन नक्षल' म्हणण्यावरून विरोधक आक्रमक

## विधानभवनाच्या पायऱ्यावर विरोधकांची घोषणाबाजी

**वृत्तसंस्था/मुंबई**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर सत्ताधाऱ्यांच्या अपमानकारक जुलुमशाही विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. त्यामध्ये राज्य सरकारच्या मंत्रिमंडळातील मंत्री आपल्या अधिकारांचा गैरवापर करून राज्यातील जमिनी बळकावत आहे. सत्ताधारी वारीसारख्या हिंदू धर्मातील पवित्र मार्गाला 'अर्बन नक्षल' म्हणून विठुरायाला आणि वारकऱ्यांना बदनाम करत असल्याचा विरोधकांनी आरोप केला.

शिवसेना (शिंदे)च्या नेत्या मनिषा कायंदे यांनी बुधवारी पंढरीच्या वारकऱ्यांमध्ये 'अर्बन नक्षलां'नी घुसखोरी केली असल्याचा आरोप केला. त्यावरून राजकारण पेटले आहे. निदर्शनादरम्यान, विरोधी पक्षाने त्यावरून सरकारला धारेवर धरले. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळातील मंत्री आपल्या अधिकारांचा गैरवापर करून राज्यातील जमिनी बळकावत आहे. सत्ताधारी वारीसारख्या हिंदू धर्मातील पवित्र मार्गाला अर्बन नक्षल म्हणून विठुरायाला आणि वारकऱ्यांना बदनाम करत आहेत, अशा मुद्यांचा अंतर्भाव होता. या आंदोलनात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उबाठा गटाचे सचिन अहिर, काँग्रेसचे सतेज पाटील, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड आदी सदस्य उपस्थित होते.



यावेळी त्यांनी हातात मंत्र्यांचे पुत्रप्रेम जमिनी बळकवण्याचा सुरू आहे गेम, जनतेकडून होतेय करवसुली, सत्ताधाऱ्यांना मात्र सवलती, राज्याची एकच व्यथा, भ्रष्ट मंत्र्यांची ऐका कथा, आठ महिन्यांची झाली सत्ता, मंत्र्यांचा भ्रष्टाचार ऐका, मंत्री भ्रष्टाचारात व्यस्त, जनता महागाईने त्रस्त, एमआयडीसीचा लाटला भूखंड, मंत्री खातोय त्याचा श्रीखंड, अशा आशयाचे फलक धरले होते. यामुळे काही वेळासाठी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

### वारीला बदनाम करणाऱ्यांचा निषेध

**विधानभवनाच्या पायऱ्यावर पंढरीच्या वारीला बदनाम करण्याचा आरोप करीत निषेध करण्यात आला. वारकऱ्यांना अर्बन नक्षल म्हणणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, भूखंड लाटणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, वारीला बदनाम करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा धिक्कार असो.. भूखंडाचा श्रीखंड खाणाऱ्या भ्रष्ट मत्र्यांचा धिक्कार असो, अशा जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली.**

लोकांचे दैनिक
# लोकशाही वार्ता
दुसरे मुखपृष्ठ - नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५ - पान ३ editorial@lokshahivarta.in

# बिहार विधानसभा निवडणुकीसाठी ‘आप’ने थोपटले दंड

## अरविंद केजरीवाल यांचे पुन्हा ‘एकला चलो’

**वृत्तसंस्था/पाटणा**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली आम आदमी पक्षाने रणशिंग फुंकले आहे. बिहारमध्ये आप इंडिया आघाडीसोबत न जाता स्वबळाचा नारा दिला आहे. याबाबत पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी घोषणा केली. केजरीवालांनी ‘एकला चलो’ अशी भूमिका घेतल्याने इंडिया आघाडीची डोकेदुखी वाढली आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीबद्दलची आम आदमी



पक्षाची भूमिका अरविंद केजरीवाल यांनी स्पष्ट केली. केजरीवालांची अहमदाबादमध्ये पत्रकार परिषद झाली. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि भाजपवर हल्ला चढवला.

अरविंद केजरीवाल म्हणाले की, काँग्रेससोबत आमची कोणतीही आघाडी असणार नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी स्वबळावर मैदानात उतरेल. बिहारमध्ये आम आदमी पक्ष निवडणूक लढवले. इंडिया आघाडी फक्त लोकसभा निवडणुकीसाठी होती. आता आमची कोणतीही आघाडी नाही. विधानसभा पोटनिवडणूक आम्ही काँग्रेससोबत न जाता लढवली आणि काँग्रेसपेक्षा तीन पट अधिक मते मिळवून विजयी झालो. आता आम आदमी पक्ष हाच पर्याय असल्याचा मेसेज जनतेने दिला आहे, असे केजरीवाल म्हणाले.

बिहारमध्ये तेजस्वी यादव यांची राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, समाजवादी पार्टी यांच्याबरोबर प्रशांत किशोर यांच्या पक्षाचाही प्रवेश झाला आहे. त्यामुळे विरोधकांच्या मतांच्या विभाजनाचाच धोका असणार आहे.

### दिल्ली विधानसभा निवडणुकीत बसला होता फटका

**दिल्ली विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवालांची आप आणि काँग्रेस स्वतंत्र लढले होते. याचा थेट फटका आपला बसल्याचे निकालाच्या आकडेवारीतून दिसून आले. त्यामुळे बिहार विधानसभा निवडणुकीत केजरीवाल इंडिया आघाडीत येणार का, याकडे लक्ष होते.**

# बागेश्वर धाममध्ये शेड कोसळून एकाचा मृत्यू, १० जखमी

## धीरेंद्र शास्त्री यांच्या मठातील आरतीनंतर दुर्घटना

**वृत्तसंस्था/छतरपूर**

मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील गढा गावात असलेल्या बागेश्वर धाम याठिकाणी एक मोठी दुर्घटना घडली आहे. धामचे पीठाधीश धीरेंद्र शास्त्री यांच्या वाढदिवसाच्या एक दिवस आधी आज सकाळी आरतीनंतर याठिकाणी टिन शेड कोसळले.

यादरम्यान एका भक्ताच्या डोक्यावर लोखंडी अँगल पडला, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात इतर १० जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान,या दुर्घटनेत जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

छतरपूर जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांनी सांगितले की, एकाला मृत अवस्थेत आणण्यात आले होते. त्याचे पोस्टमार्टम करण्यात आले आहे. एका रुग्णाचे सीटी स्कॅन करण्यात आले आहे. त्याची प्रकृती ठीक आहे. जखमी भक्ताने सांगितले की, सकाळी ७.३० च्या सुमारास हा अपघात झाला, जेव्हा लोक पावसापासून वाचण्यासाठी तंबूखाली जमले होते.

मृत भक्ताचे नाव राजेश कुमार कौशल असे आहे, जो अयोध्येचा रहिवासी आहे. तो बुधवारी रात्री त्याच्या कुटुंबातील सहा सदस्यांसह बागेश्वर धाम याठिकाणी पोहोचला होता. शुक्रवारीधामचे पीठाधीश धीरेंद्र शास्त्री यांचा वाढदिवस आहे, त्यांच्या दर्शनासाठी ते आले होते.

धीरेंद्रशास्त्री बागेश्वर धाममध्येच उपस्थित आहेत. बागेश्वर धामच्या अधिकृत सोशल मीडियावरून भाविकांना वाढदिवसानिमित्त आवाहन केले जात आहे.

# केरळमधील एफ-३५ लढाऊ विमानाची दुरुस्ती अशक्य

## तुकडे करून ब्रिटनला घेऊन जाणार

**वृत्तसंस्था/तिरूअनंतपुरम**

ब्रिटिश रॉयल नेव्हीचे लढाऊ विमान एफ-३५ गेल्या अनेक दिवसांपासून भारतात अडकून पडले आहे. केरळ किनारपट्टीपासून सुमरे १०० नॉटिकल मैल अंतरावर युद्धाभ्यास करणाऱ्या या विमानाची १४ जून रोजी खराब हवामान आणि तांत्रिक बिघाडामुळे तिरुअनंतपुरम येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आली. आता १९ दिवसांनंतरही या विमानातील बिघाड दुरुस्त करण्यात यश आले नाही. त्यामुळेच या विमानाची पार्ट्स वेगळे करुन ब्रिटनला परत घेऊन जाण्याची योजना आहे.

एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स कॅरिअर स्ट्राइक ग्रुपचा भाग असलेले ब्रिटिश रॉयल नेव्हीचे अत्याधुनिक एफ-३५ फायटर जेट सुमारे ११० दशलक्ष डॉलर्स (जवळपास ९५० कोटी रुपये) किमतीचे हे पाचव्या पिढीतील स्टील्थ जेट आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार, या विमानाने केरळच्या किनाऱ्यापासून सुमारे १०० सागरी मैल दूर असलेल्या ब्रिटिश विमानवाहू नौकेवरून उड्डाण केले होते. खराब हवामान आणि इंधन कमी झाल्याने त्याला तिरुवनंतपुरममध्ये उतरवण्यात आले. सुरुवातीला इंधनाची कमतरता हे आपत्कालीन लँडिंगचे कारण सांगितले जात होते, परंतु नंतर असे समोर आले की, विमानाच्या हायड्रॉलिक सिस्टीममध्ये बिघाड होता. अनेक प्रयत्नांनंतरही हे विमान अद्याप उड्डाण करण्यास सक्षम झालेले नाही. तांत्रिक बिघाड ठीक करण्यासाठी ब्रिटीश नेव्हीने इंजिनिअर्सची टीम भारतात पाठविली होती, मात्र त्यांनाही विमानातील बिघाड ठीक करता आला नाही.

# दिल्लीत २५ साखर कारखान्यांना पुरस्कारांचे वितरण

## राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने पुरस्कार प्रदान : महाराष्ट्रातील १० कारखान्यांचा समावेश

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने साखर कारखान्यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचे आज गुरुवारी राजधानी दिल्ली येथे वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, राष्ट्रीय साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते.

१०३ सहकारी साखर कारखान्यांपैकी २५ साखर कारखान्यांना आज पुरस्कार देण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील १० साखर कारखान्यांना पुरस्कार देण्यात आले. महाराष्ट्रनंतर तमिळनाडूला ५, उत्तरप्रदेशला ४, गुजरातला ३, तर पंजाब, हरियाणा, आणि मध्यप्रदेशातील प्रत्येकी एका कारखान्याला पुरस्कार देण्यात आला.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने देण्यात येणारा देशातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखान्याचा वसंतदादा पाटील पुरस्कार‍ हा पुण्यातील भिमाशंकर सहकारी साखर कारखान्यास (दत्तात्रेय नगर, ता. आंबेगाव) देण्यात आला आहे.

**विविध विभागनिहाय पुरस्कार पुढील प्रमाणे**

**उत्कृष्ट ऊस उत्पादकता गट - प्रथम** : विघ्नहर सहकारी साखर कारखाना (शिरोली, ता.जुन्नर), **द्वितीय** : क्रांती अग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड शेतकरी सहकारी साखर कारखाना व **तृतीय** : श्री महुवा प्रदेश सहकारी खांड उद्योग (सुरत, गुजरात)

**तांत्रिक क्षमता गट - प्रथम** : यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना (कराड, जि.सातारा), **द्वितीय** : कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना (श्रीपूर, सोलापूर) व **तृतीय** : डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना ( वांगी, जि. सांगली)

**व्हीएसआयचे पुरस्कार** - क्रांतीअग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना सर्वोत्कृष्ट

**उत्कृष्ट वित्तीय व्यवस्थापन पुरस्कार - प्रथम** : कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना (जालना), **द्वितीय** : श्री खेडूत सहकारी खांड उद्योग मंडळी (गुजरात) व **तृतीय** : श्री. नर्मदा खांडसरी उद्योग सहकारी मंडळी (गुजरात)

**विक्रमी ऊस गाळप विभाग - प्रथम** : विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना (सोलापूर), **प्रथम** : कुंभी कासारी सहकारी साखर काखाना (कोल्हापूर)

**उच्च साखर उतारा** -श्री. सोमेश्वर सहकारी साखर कारखाना (बारामती)

**उत्कृष्ट ऊस उत्पादकता - प्रथम** : बुधेवाल सहकारी शुगर मिल्स ( पंजाब), **द्वितीय** : कल्लाकुरिची कॉपरेटिव्ह शुगर (तामिळनाडू) व **तृतीय** : किसान सहकारी साखर कारखाना (उत्तर प्रदेश)

**तांत्रिक कार्यक्षमता - प्रथम** : करनाल सहकारी साखर कारखाना (हरियाणा), **द्वितीय** : चेय्यार सहकारी साखर कारखाना (तामिळनाडू) व **तृतीय** : किसान सहकारी साखर कारखाना (उत्तर प्रदेश)

**उत्कृष्ट वित्तीय व्यवस्थापन - प्रथम** : नवलसिंह सहकारी साखर कारखाना (मध्य प्रदेश), **द्वितीय** : चेंगलरायन सहकारी साखर कारखाना (तामिळनाडू) व **तृतीय** : धर्मापुरी डिस्ट्रिक्ट सहकारी साखर कारखाना (तामिळनाडू)

**विक्रमी ऊस गाळप - प्रथम** : रमाला सहकारी साखर कारखाना (उत्तर प्रदेश)

**विक्रमी साखर उतारा - प्रथम** : किसान सहकारी साखर कारखाना (उत्तर प्रदेश)

# कोट्यधीशांचे कर्ज माफ, पण शेतकरी दुर्लक्षितच



## महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याबाबत राहुल गांधींचे ट्वीट

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

ज्यांच्याकडे कोट्यवधी रुपये आहेत, त्यांचे कर्ज मोदी सरकार सहज माफ करते. पण जेव्हा शेतकरी कर्जमाफीची मागणी करतात, तेव्हा त्यांना दुर्लक्षित केले जाते, असा निशाना विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी साधला आहे.

नुकतेच राज्यात जानेवारी ते मार्च महिन्याच्या कालावधीत तब्बल ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत लेखी उत्तरात दिली आहे. त्यावर आता राहुल गांधी यांनी ट्वीट करत राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

राहुल गांधी यांनी ट्वीटमध्ये म्हटले की, ‘विचार करा’ अवघ्या ३ महिन्यांत महाराष्ट्रात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. हा फक्त आकडा आहे का? नाही. हे ७६७ उध्वस्त झालेली घरे आहेत. ७६७ कुटुंबे जी कधीच सावरू शकणार नाहीत. आणि सरकार गप्प आहे. शेतकरी दररोज कर्जाच्या खड्ड्यात अधिक खोलवर बुडत आहे. बियाणे महाग आहे, खत महाग आहे, डिझेल महाग आहे. पण एमएसपीची कोणतीही हमी नाही. जेव्हा ते कर्जमाफीची मागणी करतात, तेव्हा त्यांना दुर्लक्षित केले जाते. पण ज्यांच्याकडे कोट्यवधी रुपये आहेत, त्यांची कर्ज मोदी सरकार सहज माफ करते, असे त्यांनी म्हटले आहे.

# डाबर च्यवनप्राशची बदनामी करणारी जाहिरात बंद करा

### रामदेव बाबाच्या पंतजलीला उच्च न्यायालयाचा दणका!

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

बाबा रामदेव यांच्या पंतजलीला दिल्ली उच्च न्यायालयाने झटका दिला. पंतजली आयुर्वेदकडून डाबर च्यवनप्राशबद्दल जी जाहिरात केली जात आहे; त्यासंदर्भात न्यायालयाने महत्त्वाचे आदेश दिले. डाबर च्यवनप्राशबद्दल जी दिशाभूल करणारी आणि नकारात्मक जाहिरात केली जात आहे, ती बंद करा, असे न्यायालयाने पंतजलीला सांगितले. डाबर इंडियाने पंतजली आयुर्वेद विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. पंतजली आयुर्वेद त्यांच्या जाहिरातींमधून डाबर च्यवनप्राशबद्दल चुकीची माहिती देत असून, बदनाम करत आहे. ग्राहकांची डाबर च्यवनप्राशबद्दल दिशाभूल करत आहेत, असे आरोप याचिकेतून करण्यात आले होते.

# हजारो कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित

## मध्य प्रदेशात आंदोलनाचा इशारा

**वृत्तसंस्था/भोपाळ**

दैनंदिन वेतन मिळवणारे, कायमस्वरूपी कामगार, सुरक्षा कर्मचारी, कामाचा ताण, अर्धवेळ कर्मचारी अनेक समस्यांना तोंड देत आहेत. यासाठी मध्य प्रदेश कर्मचारी मंच कर्मचाऱ्यांच्या पगार, पेन्शन, पीएफसाठी सतत लढत आहे. सहा महिन्यांहून अधिक काळ राज्यातील बहुतेक जिल्ह्यांतील आदिवासी कल्याण विभागातील दैनिक वेतन कामगारांना पगार मिळालेला नाही, यासाठी संघटना सतत सरकारला निवेदन सादर करत आहे आणि आंदोलन करत आहे.

मध्य प्रदेश कर्मचारी मंचाची स्थापना १९९० मध्ये झाली. रोजंदारी मिळवणाऱ्या आणि कमी पगार असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी संघटनेकडून दीर्घ लढाई लढली जात आहे.

कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत संघटना ऑगस्टमध्ये हल्ला बोल आंदोलन सुरू करणार आहे. यासाठी कर्मचाऱ्यांना संघटित करण्यासाठी जुलै महिन्यात भोपाळसह राज्यभरातील कार्यालयांमध्ये जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जातील. यासोबतच पुढील महिन्यात होणाऱ्या आंदोलनाची रूपरेषा तयार केली जाईल.

### शोषणाविरुद्ध युद्ध

**राज्यात दैवेबो, प्रभारी आणि अर्धवेळ कर्मचारी शोषणाचे बळी ठरत आहेत. आम्ही याविरुद्ध सतत आवाज उठवत आहोत. २००४ मध्ये आम्ही २८ हजार दैवेबो कर्मचाऱ्यांच्या बडतर्फीविरुद्ध लढा दिला आणि जिंकलो. यासोबतच, कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत आम्ही पुढील महिन्यात आंदोलन सुरू करत आहोत.**



अनंतनाग : अमरनाथ यात्रा सुरू झाली आहे. येथे जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग येथील पहलगाम येथे शेषनाग बेस कॅम्पमध्ये अशा राहुट्या उभारण्यात आल्या आहेत.

# निलंबित केले, पण बदली का नाही?

## बंगळुरू पोलिसांच्या कारवाईवर उच्च न्यायालयाने प्रश्न

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

४ जून रोजी बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. आता कर्नाटक उच्च न्यायालयाने या प्रकरणात कठोर भूमिका घेतली आहे. गुरुवारी न्यायालयाने राज्य सरकारला विचारले की या अपघातासाठी पाच पोलिसांना निलंबित करणे किती न्याय्य होते? न्यायालयाने असा प्रश्न उपस्थित केला की या अधिकाऱ्यांना दुसऱ्या ठिकाणी बदली करणे पुरेसे नसते का?

न्यायाधीश एस.जी. पंडित आणि टी.एम. नदाफ यांच्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सरकारला या निलंबनामागील ठोस कारण विचारले. न्यायालयाने म्हटले की निलंबनाचा निर्णय योग्य होता की नाही हे सरकारला सिद्ध करावे लागेल. कर्नाटक सरकारने १ जुलै रोजीच्या केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (कॅट)च्या निर्णयाला आव्हान दिले तेव्हा हे उघड झाले. या निर्णयात आयपीएस अधिकारी विकास कुमार विकास यांचे निलंबन रद्द करण्यात आले.

# मूळ संविधानात ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द नव्हता


## सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांचे अविमुक्तेश्वरानंदांकडून समर्थन

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनीदेखील ‘धर्मनिरपेक्ष’ या शब्दाबद्दल एक विधान केले आहे. त्यांनी ‘धर्मनिरपेक्ष’ हा शब्द मूळतः भारतीय संविधानात समाविष्ट नव्हता. परंतु नंतर जोडला गेला, असे म्हटले आहे. शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांचे हे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी केलेल्या विधानाला समर्थन देणारे आहे.

शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज म्हणाले की, हा शब्द संविधानाच्या मूलभूत स्वरूपाशी जुळत नाही आणि म्हणूनच हा विषय वेळोवेळी चर्चेत येतो.

धर्माची व्याख्या करताना



शंकराचार्य म्हणाले की, धर्म म्हणजे बरोबर आणि चूक यात फरक करणे, बरोबर स्वीकारणे आणि चुकीचे सोडून देणे. परंतु ‘धर्मनिरपेक्ष’ असणे म्हणजे बरोबर किंवा चूक यांच्याशी काहीही संबंध नसणे, जे कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात शक्य नाही. म्हणूनच, त्यांचा असा विश्वास आहे की हा शब्द भारतीय विचारसरणीला अनुरूप नाही.

अलीकडेच, आरएसएस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त संविधानात केलेल्या बदलांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी, आणीबाणीच्या काळात संविधानाच्या प्रस्तावनेत ‘समाजवाद’ आणि ‘धर्मनिरपेक्षता’ सारखे शब्द जोडले गेले होते आणि आता ते काढून टाकण्याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे, असे म्हटले होते. त्यांच्या विधानामुळे वाद निर्माण झाला होता, परंतु आता केंद्र सरकारच्या दोन वरिष्ठ मंत्र्यांनीही त्यांच्या विचारांना पाठिंबा दिला आहे.

केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते शिवराज सिंह चौहान यांनी दत्तात्रय होसाबळे यांच्या विधानाला पाठिंबा देत या मुद्यावर विचार करण्याची गरज आहे.‍ असे म्हटले होते. त्याच वेळी, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनीही आरएसएस नेत्याच्या शब्दांचे समर्थन केले. मात्र, या संवेदनशील मुद्यावर भारतीय जनता पक्षाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

### संविधानाची प्रस्तावना कोणत्याही देशात बदललेली नाही-उपराष्ट्रपती

**उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही सांगितले की, संविधानाची प्रस्तावना त्याच्या मूळ स्वरूपाचे प्रतिनिधित्व करते म्हणून ती बदलू नये. संविधानाची प्रस्तावना जगातील इतर कोणत्याही लोकशाही देशात बदललेली नाही, हे फक्त भारतातच घडले आहे. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांनी संविधान निर्मितीमध्ये अथक परिश्रम घेतले होते आणि जर हे शब्द इतके महत्त्वाचे असते, तर त्यांनी ते मूळ प्रस्तावनेत निश्चितच ठेवले असते. न्यायाधीश हेगडे आणि न्यायमूर्ती मुखर्जी यांच्या एका निर्णयाचा उल्लेख करून ते म्हणाले की, प्रस्तावना हा संविधानाचा आत्मा मानला गेला आहे आणि तो अपरिवर्तनीय आहे.**

# बेशुद्ध करून लिंग परिवर्तन शस्त्रक्रिया

## कोल्डड्रिंक पिऊन बेशुद्ध झाला, शुद्धीवर येताच धक्का बसला!

**वृत्तसंस्था/रामपूर**

उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, जिथे एका विवाहित पुरुषाने आपल्यावर जबरदस्तीने लिंग परिवर्तन शस्त्रक्रिया केल्याचा आरोप केला आहे. पीडित व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, त्याला कोल्डड्रिंक देऊन बेशुद्ध केले गेले आणि त्यानंतर त्याचे गुप्तांग कापण्यात आले.

पीडित व्यक्तीने दिलेल्या माहितीनुसार, तो एका नृत्य कार्यक्रमासाठी बदाऊनला जात असताना, त्याला लविना किन्नर आणि तिचा मित्र विकास भेटले. लविनाने त्याला आपल्या घरी नेले, जिथे त्याला कोल्ड्रिंक देण्यात आले. ते कोल्ड्रिंक प्यायल्यानंतर तो बेशुद्ध पडला आणि त्याला शुद्ध आली ती थेट रुग्णालयात, पाच दिवसांनंतर. शुद्धीवर आल्यावर त्याला समजले की, त्याचे लिंग कापले गेले आहे आणि त्याचे लिंग परिवर्तन झाले आहे. सध्या तो रुग्णालयात असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

पीडितेच्या पत्नीने या प्रकरणी आरोपींविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. पत्नीने सांगितले की, तिचा नवरा एक विनोदी कलाकार आणि नर्तक आहे आणि तो लविनासोबत पार्ट्यांमध्ये काम करतो. लविना आणि विकास यांनी तिच्या पतीला आमिष दाखवून लविनाच्या घरी नेले. तिथे लविनाने तिच्या पतीच्या पेयात मादक पदार्थ मिसळले. बेशुद्ध अवस्थेत, लविना आणि विकास यांनी तिच्या पतीची जबरदस्तीने लिंग बदलाची शस्त्रक्रिया केली.

पत्नीने पुढे सांगितले की, पाच दिवसांनी तिच्या पतीला शुद्ध आल्यावर त्याने फोन करून तिला या घटनेची माहिती दिली. डॉक्टरांनी या प्रकरणाची पुष्टी केली असून, काही वैद्यकीय अहवाल मागवले आहेत. डॉ. आर.के. चंदेल यांनी सांगितले की, लिंग बदलाचे प्रकरण समोर आले आहे आणि काही अल्ट्रासाऊंडसह इतर अहवाल मागवण्यात आले आहेत.

### पोलिसांची कारवाई

**पोलिसांनी सांगितले की, पीडित व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करून त्याला जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी लविना किन्नर आणि विकास यांना ताब्यात घेतले असून, पुढील चौकशी सुरू आहे. तपासानंतर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.**

लोकशाही वार्ता
संपादकीय

# रिझर्व्ह बँकेचा मोलाचा सल्ला

भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत नागरिकांची सायबर फसवणूक रोखण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. दूरसंचार विभागाचे आर्थिक फसवणूक जोखीम निर्देशक (एफआरआय) एकत्रित करण्याचा सल्ला भारतीय रिझर्व्ह बँकेने देशातील बँकांना दिला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने अलीकडेच जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे दूरसंचार विभागाने स्वागत केले आहे. यामध्ये सर्व अनुसूचित व्यावसायिक बँका, लघु वित्त बँका, पेमेंट बँका आणि सहकारी बँकांना दूरसंचार विभागाने विकसित केलेल्या आर्थिक फसवणूक जोखीम निर्देशक त्यांच्या प्रणालींमध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. सायबर-सक्षम आर्थिक फसवणुकींविरुद्धच्या लढाईतील हा एक महत्त्वाचा क्षण आहे आणि भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आंतर-एजन्सी सहकार्याच्या सामर्थ्याचा पुरावा आहे. यामुळे एपीआय-आधारित एकत्रीकरणाद्वारे बँका आणि डॉटच्या डीआयपीदरम्यान आकडेवारीची स्वयंचलित देवाणघेवाण करण्याचे धोरणात्मक महत्त्वदेखील अधोरेखित होते. यामुळे फसवणूक जोखीम प्रारूप अधिक परिष्कृत करण्यासाठी रिअल-टाइम प्रतिसाद आणि सतत अभिप्राय उपलब्ध होतो.

दूरसंचार विभागाच्या डिजिटल इंटेलिजेंस युनिटने सुरू केलेला आर्थिक फसवणूक जोखीम निर्देशक हे एक जोखीम आधारित मोजमाप आहे. जो एखाद्या मोबाइल क्रमांकाला आर्थिक फसवणुकीच्या मध्यम, उच्च किंवा खूप उच्च जोखमीशी संबंधित असल्याचे वर्गीकृत करतो. हे वर्गीकरण विविध भागधारकांकडून मिळालेल्या माहितीशी निगडित आहे, ज्यामध्ये इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल, दूरसंचार विभागाचा चक्षु मंच तसेच बँका आणि वित्तीय संस्थांनी सामायिक केलेल्या गुप्तचर माहितीचा समावेश आहे. हे भागधारकांना विशेषतः बँका, एनबीएफसी आणि यूपीआय सेवा प्रदात्यांना मोबाइल क्रमांक उच्च जोखमीचा असल्यास अंमलबजावणीला प्राधान्य देण्यास तसेच अतिरिक्त ग्राहक संरक्षण उपाययोजना करण्यास सक्षम करते. दूरसंचार विभागाचे डिजिटल इंटेलिजेंस युनिट नियमितपणे भागधारकांसोबत मोबाइल क्रमांकांची यादी सामायिक करते. यामध्ये सायबर गुन्ह्यांमुळे लिंक्समुळे खंडित झालेले क्रमांक, अयशस्वी पुनर्पडताळणी किंवा

भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत नागरिकांची सायबर फसवणूक रोखण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. दूरसंचार विभागाचे आर्थिक फसवणूक जोखीम निर्देशक (एफआरआय) एकत्रित करण्याचा सल्ला भारतीय रिझर्व्ह बँकेने देशातील बँकांना दिला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने अलीकडेच जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे दूरसंचार विभागाने स्वागत केले आहे. यामध्ये सर्व अनुसूचित व्यावसायिक बँका, लघु वित्त बँका, पेमेंट बँका आणि सहकारी बँकांना दूरसंचार विभागाने विकसित केलेल्या आर्थिक फसवणूक जोखीम निर्देशक (एफआरआय) त्यांच्या प्रणालींमध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. सायबर-सक्षम आर्थिक फसवणुकींविरुद्धच्या लढाईतील हा एक महत्त्वाचा क्षण आहे आणि भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आंतर-एजन्सी सहकार्याच्या सामर्थ्याचा पुरावा आहे.

गैरवापर यांचा तपशील असतो. यापैकी बरेच क्रमांक आर्थिक फसवणुकीशी निगडित असतात. संशयास्पद व्यवहार नाकारणे, ग्राहकांना सावध करणे किंवा इशारे देणे तसेच उच्च जोखीम म्हणून चिन्हांकित व्यवहारांना विलंब करणे यासारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी बँका आणि वित्तीय संस्था रिअल टाइममध्ये एफआरआयचा वापर करू शकतात. फोनपे, पंजाब नॅशनल बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, पेटीएम आणि इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक यासारख्या आघाडीच्या संस्थांनी या प्लॅटफॉर्मचा सक्रियपणे वापर करून या प्रणालीची उपयुक्तता आधीच दाखवून दिली आहे. यूपीआय ही संपूर्ण भारतात सर्वात पसंतीची पेमेंट पद्धत असल्याने, हिच्या हस्तक्षेपामुळे लाखो नागरिक सायबर फसवणुकीला बळी पडण्यापासून वाचू शकतात. एफआरआयने टेलिकॉम आणि वित्तीय अशा दोन्ही क्षेत्रातील संशयित फसवणुकीविरुद्ध जलद, लक्ष्यित आणि सहयोगी कारवाई करण्यास अनुमती दिली आहे. विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमुळे निर्माण होणारा धोका वारंवारता आणि गुंतागुंतीत वाढत आहे. एनसीबीआयच्या अहवालानुसार सायबर हल्ल्यांचा प्रसार आणि गुंतागुंत वाढत असताना, पुनर्प्राप्ती आणि प्रतिबंधासाठी लागणारा खर्चही वाढत आहे. सायबर हल्ल्यांना रोखणे हे एक मोठे आव्हान आहे कारण सायबर गुन्हेगार वापरत असलेले तंत्रज्ञान आणि तंत्रे त्यांना रोखण्यासाठी डिझाइन केलेल्या पद्धतींइतक्या वेगाने विकसित होतात. त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी, संस्था सायबर सुरक्षा व्यावसायिकांच्या कौशल्यावर अवलंबून असतात. सायबर सुरक्षेतील भूमिकेसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक आणि नेतृत्व कौशल्यांचा मजबूत पाया तयार करण्यासाठी प्रगत प्रशिक्षण आवश्यक आहे. सायबर गुन्हेगार व्यक्तींचे शोषण करण्यासाठी, वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी आणि संगणक आणि माहिती सुरक्षा नेटवर्कमध्ये व्यत्यय आणण्यासाठी विविध युक्त्या वापरतात. जगभरातील ७८ टक्के संस्था आणि अमेरिकेतील ७६ टक्के संस्था यशस्वी सायबर हल्ल्यांमुळे हॅक होतात. सायबर हल्ले सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील नेटवर्कना लक्ष्य करतात, ज्यामुळे ऊर्जा, आरोग्य, वाहतूक आणि वित्तीय सेवांना आधार देणाऱ्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना धोका निर्माण होतो. वैयक्तिक माहितीपासून ते कॉर्पोरेट डेटा आणि व्यापार गुपिते यापर्यंतचा डेटा शोधत, सायबर गुन्हेगार व्यक्ती, कंपन्या, शाळा आणि विद्यापीठे आणि सरकारी संस्थांना लक्ष्य करतात. सायबर गुन्ह्यांशी संबंधित खर्च प्रचंड आहे. सायबर गुन्हे अनेक प्रकारचे असतात.

# कानडा राजा पंढरीचा!

महाराष्ट्रात धर्माला फार महत्त्व दिले जाते. धर्मतेज जागवणारा पंढरीचा विठोबा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमेवर आहे. काही जण म्हणतात, हा धनगरांचा देव आहे. हा मूळ आदिम (आदिवासी), अ-नागर देवच पुढे धनगरांसह पंडरिगे या गावी आला आणि पुढे तो पांडुरंग झाला. पंडरिगे या गावाची पंढरी झाली. पूर्वी तेथे धनगरांच्या वस्त्या होत्या; परंतु नंतर नागरवस्तीमुळे पुढे या पंढरीला पंढरपूर या नावाने संबोधण्यात येऊ लागले. अशारीतीने पंढरीचे पंढरपूर झाले. पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत भानुदास (संत एकनाथ महाराज यांचे आजोबा) हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर, असे त्यांना सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली.



मागोवा
जगन घाणेकर
९६६४५५९७८०

पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला वीरभद्र म्हणजेच विठ्ठल म्हणतात, तर वैष्णव त्याला गोपाळकृष्ण असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे, म्हणूनच तो हरिहर आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे, असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे, असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते.

ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा, असे जैनांचे मत आहे. दक्षिणेला हाच गोपाल श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे, तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रूसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती. विठ्ठलाला पांडुरंग म्हणतात, तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून वेंगडम असे म्हणतात. त्यामुळेच त्याला विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश असेही म्हणतात. कुरूबा (कुरूबा समाज हा धनगर पोटजातीपैकी एक आहे) आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून विठोबा निर्माण झाला.

शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे, म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपती या दोन्ही मूर्तींत पुष्कळ साम्य आढळते. पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मिळतो. त्यामुळेच संतांनी सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु, असे त्याचे वर्णन केले आहे. संतांनी त्याला कानडा म्हणूनही हाक मारली आहे. चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्याचा जसा भक्तीभाव असेल, तशी त्याला देव अनुभूती देतो. बंगालमधील कोलकाता येथील कोळ्यांच्या राणीने दक्षिणेश्वरीदेवीची स्थापना केली होती. त्या देवळात तिने श्रीरामकृष्ण परमहंस यांची पुजारी म्हणून नियुक्ती केली होती. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या भक्ती-भावामुळे देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्यांना दर्शन दिले. अनेकांना वाटते, दगडात देव असतो का? परंतु भक्ती-भावाने दगडालाही पाझर फुटतो, हे ध्यानात घ्यायला हवे.पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस, कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते. संत ज्ञानदेव म्हणतात, तुज सगुण म्हणो की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे। म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो पांडुरंग आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे. त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे. एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे.

**घाटकोपर, मुंबई**

# 'जैश'चे दहशतवादी तळ पुन्हा सक्रिय

ऑपरेशन सिंदूरच्या जखमांवर अजूनही उपचार करणारा पाकिस्तान जम्मू आणि काश्मीरमध्ये हिंसाचार पसरवण्यासाठी दहशतवाद्यांना शस्त्रे आणि प्रशिक्षण देण्याच्या आपल्या धोरणापासून मागे हटताना दिसत नाही. पाकिस्तानचे सैन्य आणि गुप्तचर संस्था आयएसआयने जम्मू आणि काश्मीरमध्ये आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर दहशतवादी तळ, लाँचिंग पॅड दुरुस्त करण्यास आणि काही नवीन दहशतवादी प्रशिक्षण तळ बांधण्यास सुरुवात केली आहे.

तथापि, नवीन छावण्यांचा आकार सध्याच्या छावण्यांपेक्षा लहान ठेवण्यात आला आहे, ज्यामध्ये एका वेळी जास्तीत जास्त ५०-७५ दहशतवाद्यांना सामावून घेण्याची आणि प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे. लाहोरजवळील मुरीदके येथे असलेले लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय आणि बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय देखील नूतनीकरणानंतर जिहादी घटकांचा एक नवीन गड बनले आहे.

दहशतवादी संघटनांमध्ये समन्वय राखण्यासाठी, पाकिस्तानी गुप्तचर संस्थेने एकीकृत कमांड तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. एकीकृत ऑपरेशनल कमांडची रूपरेषा निश्चित करण्यासाठी, पाकिस्तानी गुप्तचर संस्थेने अलीकडेच लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद, हिजबुल मुजाहिदीन, अल-बद्र, तहरीक-ए-जिहाद इस्लामी, मुस्लीम जनाबाज फोर्स, तहरीकुल मुजाहिदीन, हुजी यासह विविध दहशतवादी संघटनांच्या शीर्ष कमांडर्सची बैठक बोलावली होती. यामध्ये जम्मू-काश्मीरमधील वाढत्या दहशतवादी कारवाया आणि जम्मू काश्मीरमध्ये सक्रिय असलेल्या दहशतवाद्यांना शस्त्रास्त्रे आणि पैशांच्या पुरवठा साखळीवर चर्चा झाली. गेल्या काही दिवसांत जैश, लष्कर आणि अल-बद्र सारख्या संघटनांनी लाहोर, मुलतान, कराचीसह पाकिस्तानच्या विविध शहरांमध्ये आणि शहरांमध्ये तसेच व्याप्त जम्मू काश्मीरमधील मुझफ्फराबाद, चकोठी, भिंबर येथे मेळावे घेतले. या मेळाव्यांमध्ये, भारतीय सैन्याच्या कारवाईत नष्ट झालेल्या दहशतवादी छावण्या आणि मारल्या गेलेल्या दहशतवादी कमांडरांच्या छायाचित्रांसह काश्मीर जिहादच्या नावाखाली नवीन दहशतवाद्यांची भरती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



विश्ववार्ता
प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
९५६१५९४३०६

दरम्यान,२२ एप्रिलला पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटक आणि एका स्थानिक नागरिकाचा निष्पाप बळी गेला होता. त्यानंतर ७ मे रोजी भारताने दहशवाद्यांचा नायनाट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवले. त्याअंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ वेगवेगळ्या दहशतवादी तळांना लक्ष्य करीत, ते उद्ध्वस्त करण्यात आले. त्यानंतर भारतीय लष्कराकडून ज्या तळांवर हल्ले करण्यात आले, तेथे झालेले नुकसान आणि परिस्थितीबाबतच्या उपग्रह प्रतिमा प्रकाशित केल्या. उद्ध्वस्त केलेल्या तळांमध्ये बहावलपूर येथील जैश-ए-मोहम्मदच्या तळाचाही समावेश होता. असे असताना जवळपास दोन महिन्यांनंतर पुन्हा या ठिकाणी दहशतवादी तोंड वर काढताना दिसत आहेत. या ठिकाणी जामा-ए-मस्जिद सुभान अल्लाह मदरशाच्या काही लोकांनी मदरशातील स्विमिंग पूल पुन्हा सुरू केल्याचे काही फोटोंच्या माध्यमातून आढळले आहे.

ऑपरेशन सिंदूनंतर जैशने त्यांच्या मदरशातील हा स्विमिंग पूल काही काळासाठी बंद केला होता. या स्विमिंग पूलमध्ये जैश-ए-मोहम्मदकडून मदरशात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण दिले जात असे. आता परत बहावलपूरमधील दहशतवादी तळावर भारताने केलेल्या हल्ल्यानंतर जैश-ए-मोहम्मदने तिथला मदरसा पुन्हा सुरू केला आहे. येथे सध्या सुमारे ६०० विद्यार्थी येत आहेत. बहावलपूर येथील दहशतवादी तळ पुन्हा सुरू होण्यावरून हा संकेत मिळत आहे की, जैश-ए-मोहम्मद संघटना बंद होण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे भारताविरुद्ध त्यांच्या दहशतवादी कारवाया सुरूच राहतील, अशी परिस्थिती समोर येते आहे. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर यानंतर भारत-पाकिस्तानमधील शत्रुत्व वाढत असताना जैश-ए-मोहम्मदचे नेतृत्व भारताविरुद्ध आवाज उठवू लागले आणि हल्ल्याचा बदला घेण्याची मानसिकता असल्याचेही बोलले जात आहे. जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझहरने त्याच्या भाषणांची ऑडिओ रेकॉर्डिंग्स जारी केली आहेत. त्यामध्ये भारतातील अयोध्या राम मंदिर उद्ध्वस्त करण्याची शपथ घेतल्याचे वृत्त आहे. तसेच ऑपरेशन सिंदूरदरम्यान मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या अंत्यसंस्कारासाठी याच संघटनेने निधी दिल्याचाही दावा केला जात आहे. ऑपरेशन सिंदूरनंतरच्या काळात याच दहशतवादी संघटनेने सोशल मीडियावर जिहादाचा प्रचार, मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांचा गौरव करणे आणि व्हॉट्सॲप तसेच टेलिग्रामद्वारे उघडपणे तरुणांची दहशतवादी म्हणून भरती करण्यास सुरुवात केली. त्याशिवाय फेसबुक पेजवर त्यांचा प्रमुख मसूद अझहरची प्रक्षोभक भाषणे आणि बहावलपूरमध्ये रिमेम्बरन्स रॅलीची होर्डिंग्जही दिसू लागली आहेत.

**वर्धा**

# मराठी मुलांवर हिंदीची सक्ती अयोग्यच

नुकतेच आपल्या राज्यातील शालेय शिक्षणात हिंदी विषय सक्तीचा करण्याचा प्रस्तावावरून सध्या राज्याच्या राजकारणात आणि समाजमनात एक नवीन वादाचा धुराळा उठलेला आहे. केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण धोरणानुसार हिंदी विषय द्वितीय भाषा म्हणून सक्तीचा कण्याच्या प्रयत्नावरून शिवसेना उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी अस्तित्वावर व अस्मितेवर गदा आणण्याचा आरोप करत त्यांनी राज्यातील महायुती सरकारला चांगलेच धारेवर धरले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सर्व शाळांच्या मुख्यध्यापकांना थेट पत्र पाठवून विद्यार्थ्यांवर हिंदी विषयाची सक्ती करू नये, अशी सक्त सूचना दिली आहे. मराठी मुलांवर हिंदी लादण्याचा हा प्रकार म्हणजे भाषिक व सांस्कृतिक दडपशाही असल्याचा कडवट सूर त्यांनी आळवला आहे.

मराठीप्रेमी पक्ष म्हणून मनसेने मायमराठीच्या हक्कासाठी कायम आक्रमक भूमिका ठेवली आहे. आताही त्यांनी शिक्षणात हिंदी विषयाची सक्ती करण्याला राजकीय आणि सामाजिक स्वरूप दिले आहे. उद्धव ठाकरे यांनीही हिंदी विषयाला विरोध केला आहे. केंद्र सरकारने हिंमत असेल तर तामिळनाडू आणि गुजरात राज्यांमध्ये हिंदी विषयाची सक्ती करून दाखवावी, असे थेट आव्हान दिले आहे. तामिळनाडूसह इतर काही राज्यांनी यापूर्वीच केंद्र सरकारच्या त्रैभाषा सूत्राला विरोध केला आहे. हिंदी सक्तीच्या मुद्द्याला एक प्रकारे राजकीय केंद्र व प्रादेशिक स्वायत्तता यातील संघर्षाचे स्वरूप प्राप्त होत आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी वेगवेगळी मते प्रकट केली असली तरी शिक्षणप्रेमी आणि समाजधुरिणांचीही मतमतांतरे आहेत. हिंदीसह इंग्रजी आणि मातृभाषा या तिन्ही भाषांचे महत्त्व टिकवून ठेवले पाहिजे. मात्र अनेक अभ्यासकांना, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे मुलांच्या मातृभाषेतच अधिक परिणामकारक वाटते. काही भाषा शास्त्रज्ञांच्या मतानुसार मराठी मातृभाषा असलेल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मराठीतच व्हावे, ही मागणी निश्चितच अनावश्यक वाटत नाही. मराठीची अस्मिता, मराठीचा सन्मान कायम ठेवून हिंदी शिकवण्याचा पर्याय खुला ठेवावा, पण सक्ती न करता ऐच्छिक ठेवावी, असा त्यांनी माध्यम मार्ग सुचवला आहे. सत्ताधारी पक्षाने या वादात



प्रासंगिक
मधुकर चुटे
९४२०५६६४०४

उडी न घेता शिक्षण धोरण हे केंद्र सरकार व राज्यांचे समन्वयाचे क्षेत्र आहे, अशी भूमिका घेऊन वादापासून बचावात्मक भूमिका घेतली आहे. सत्ताधारी भाजपला उत्तर भारतीय मतदारांची मने दुखवायची नसल्यामुळे मराठी अस्मिता व हिंदीचा दबाव यातील समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी ही केवळ भाषा नाही तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि बौद्धिक ओळखीचा मूळ गाभा आहे. अशावेळी राज्यात हिंदी भाषेची सक्ती केली तर तो फक्त शिक्षणातील निर्णय राहात नाही तर तो एक सांस्कृतिक व राजकीय हस्तक्षेप म्हणून पाहिला जातो. हिंदी शिकली पाहिजे, पण त्याचा मार्ग आकर्षणाचा असावा, सक्तीचा नव्हे.

राज्यातील महापालिकेच्या अनेक मराठी शाळा सीबीएसईकडे वळवण्यात आल्या आहेत. आणि ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकारने पुन्हा एकदा नेमलेली समिती मान्य नसल्याचे म्हटले आहे. समितीच्या अहवालाचा घोळ घालू नका, अन्यथा या समितीला महाराष्ट्रात काम करू देणार नाही, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे. मराठी भाषेसाठी राज्यातील मराठी माणूस एकवटताना दिसला, हा खरा आनंदच आहे. हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टहास का करत होते याचे उत्तर मात्र शेवटपर्यंत मिळाले नाही. राज्य सरकारवर नेमका दबाव कुठून येत आहे हे अद्याप गूढच आहे.

**नागपूर**

# चेंगराचेंगरीच्या वाढत्या घटना चिंताजनक

ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या वेळेस रविवारी पहाटे ४ वाजून ३० मिनिटांनी भक्तगण श्रीगुंडीचा मंदिराच्या सामोर भगवान जगन्नाथ यांचे दर्शन करण्यासाठी मोठ्या संख्येने जमा झाले होते. याच वेळेस अचानक धक्का-मुक्की झाली. अशा परिस्थितीत लोकांना काहीच समजेनासे झाले व चेंगराचेंगरी झाली. यात सहा भाविकांचा मृत्यू झाला तर ५० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झाले. भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान लाखोच्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे अशा दुर्घटनांवर स्थानिक प्रशासन, राज्य सरकार व केंद्र सरकारने करडी नजर ठेवणे गरजेचे आहे. अशाच प्रकारे मे महिन्यात गोव्यातील लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा, महाराष्ट्र आणि कर्नाटक येथून दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात. परंतु ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ वाजताच्यादरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली. यात सहा लोकांचा मृत्यू झाला होता. ८० पेक्षा अधिक गंभीर जखमी झाले होते. वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्ल्यांमधून मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.

मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते.यातील काही जण उतार असल्याने खाली पडले.त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीची घटना झाली. दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते. त्याची पुनरावृत्ती आपल्याला पुरीच्या रथयात्रेदरम्यान श्री गुंडीचा मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठव्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत सहाजणांचा मृत्यू झाला होता व ४० हून अधिक गंभीर जखमी झाले होते. टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते. यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमार चार हजारांहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या पाच भाविकांचा मृत्यू झाला. अशाप्रकारे सहा भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले. देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, कीर्तन परिसर, गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान श्री गुंडीचा मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे. कारण भाविकांनी गर्दी करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे फळ भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते. याआधीही देशात चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत. यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला होता.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना, अरुंद



दृष्टिकोन
रमेश कृष्णराव लांजेवार
९९२१६९०७७९

मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात. धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शनने (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असे दिसून आले की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात. उत्तर प्रदेशातील हाथरस येथे ४ जुलै २०२४ रोजी एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले. २४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला. १ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे. देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतीक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात समन्वय व्यवस्थित असला तर चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात. अशाप्रकारे या भयावह घटना टाळण्यासाठी भाविक, मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन, राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे. अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे. कारण या दुर्घटना आपण सहज टाळू शकतो.

**नागपूर**

लोकसंवाद

## ऑनलाईन फसवणुकीचा नवा मार्ग 'सेक्सटॉर्शन'

**सध्याचे** युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेटचे स्वरूप जसे विस्तारित गेले तसे ऑनलाइन गुन्हेगारीही विस्तारित गेली. ऑनलाइन गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची सायबर शाखा सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे असे असतानाही ऑनलाइन गुन्हे करणारे नवनवीन मार्ग शोधून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत असतात. या फसवणुकीला केवळ सर्वसामान्य नागरिकच नाही तर नोकरदार, व्यावसायिक, डॉक्टर, वकील, इंजिनियर या सारखे प्रतिष्ठित नागरिक ही बळी पडतात. या सायबर गुन्हेगारांनी आता फसवणुकीचा मार्ग शोधून काढला आहे. तो आहे सेक्सटॉर्शन. अलीकडच्या काळात ऑनलाइन लैंगिक छळाचे प्रमाण वाढले आहे. त्यातूनच हा शब्द निर्माण झाला आहे. अक्स्टॉर्शन म्हणजे खंडणी तसाच लैंगिक खंडणी म्हणजे सेक्सटॉर्शन. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटचा यासाठी वापर केला जातो. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटवरुन तुम्हाला एका अनोळखी मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट येते.

ती फ्रेंड रिक्वेस्ट माहिती न घेता स्वीकारली जाते. नंतर मेसेंजरच्या माध्यमतातून चॅटिंग केली जाते. त्यानंतर एकमेकांचे व्हाट्सॲप नंबर घेऊन व्हाट्सएपवर चॅटिंग होते. चॅटिंग बरोबरच व्हिडिओ कॉल, व्हाट्सॲप कॉल करण्यास सुरुवात होते. समोरची व्यक्ती अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव करते. समोरच्या व्यक्तीला मोहात अडकवले जाते. त्याला प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून विवस्त्र अश्लील बाबी करून घेतल्या जातात. विशेष म्हणजे या सर्वांचे व्हिडिओ ऑन स्क्रीन रेकॉर्ड केले जातात. त्यानंतर काही दिवसांच्या फरकाने तुम्हाला मेसेज, फोन कॉल करून पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास तुमचा अश्लील व्हिडिओ व्हायरल करून बदनाम करण्याची धमकी दिली जाते. अशा प्रकारे लैंगिक खंडणी सेक्सटॉर्शनची मागणी केली जाते. यात प्रामुख्याने कॉलेजमधील विद्यार्थी व समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना टार्गेट केले जाते. यात फसणारे बदनामीला घाबरून या सायबर गुन्हेगारांना हवी ती रक्कम देतात. बऱ्याचदा रक्कम देऊनही पुन्हा मागणी केली जाते. त्यामुळे फसवले गेलेले मानसिक तणावात येतात त्यातून ते आत्महत्येचा मार्गही स्वीकारतात. या प्रकाराला बळी पडून काही जणांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सेक्सटॉर्शन हा पैसे कमावण्याचा नवा मार्ग सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. या सायबर गुन्हेगारांना पकडणे सायबर पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले आहे कारण हे गुन्हेगार राज्याबाहेर किंवा देशाबाहेरचेही असू शकतात. या सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये, यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना सावधगिरी बाळगायला हवी. कोणाचीही अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. आपली फ्रेंड लिस्ट आणि फॉलोअर्स वाढवण्याचा अट्टाहास आपले आर्थिक व मानसिक नुकसान करू शकतो. आजची तरुणाई सोशल मीडियाची मोठी फॅन बनली आहे. इंटरनेट, मोबाईल ही तरुणांची जीवनावश्यक गरज बनली आहे. मात्र याचा वापर समाजहिताच्या गोष्टी जोपासण्यासाठी झाला तरच उत्तम नाहीतर तुमची एक चूक तुमच्या जीवावरही बेतू शकते. म्हणूनच प्रत्येकाने सावधगिरी बाळगून सोशल मीडियाचा वापर करावा.

**श्याम ठाणेदार**, दौंड, जि. पुणे
९९२२५४६२९५

# पर्यटन उद्योगाला जागतिकस्तरावर चालना मिळेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन : पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टूर स्पर्धेचे आयोजन

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्य शासनाच्या सहकार्याने पुणे जिल्हा प्रशासन व सीएफआयच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टूरच्या माध्यमातून वार्षिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकलिंग स्पर्धेचे आयोजन अतिशय स्तुत्य उपक्रम असून पुण्याला प्रमुख पर्यटन आणि जागतिक क्रीडा केंद्र म्हणून प्रस्थापित करणे या भव्य स्पर्धेमुळे शक्य होणार आहे. पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टुर स्पर्धा येत्या तीन-चार वर्षांत निश्चितच जागतिकस्तरावर लोकप्रिय स्पर्धा ठरेल, या स्पर्धेमुळे राज्यातील पर्यटन उद्योगाला जागतिकस्तरावर चालना मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी पुणे आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय) यांच्यात पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टूर २०२६ च्या आयोजनासाठी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुख्य सचिव राजेश कुमार, सीएफ आयचे अध्यक्ष पंकज सिंघ, जनरल सेक्रेटरी महिंद्र पाल सिंघ यांच्यासह संबंधित अधिकारी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या, परंपरा, संस्कृती आणि निसर्गसौंदर्यासह राज्याचे उत्पादन आणि तंत्रज्ञान हब असलेल्या पुण्यात या स्पर्धेच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्रातील संधींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल. त्यासोबतच राज्यात पर्यटकांची संख्या अधिक वाढण्यास आणि त्याद्वारे राज्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळण्यासाठी देखील ही स्पर्धा उपयुक्त ठरेल. पुण्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अग्रगण्य पर्यटन स्थळ म्हणून प्रस्थापित करणे याद्वारे शक्य असून जागतिक क्रीडा कॅलेंडरमध्ये पुण्याचे नाव या स्पर्धेमुळे स्थापित होणार आहे, ही निश्चितच खूप आनंदाची बाब आहे. जगभरातील दोनशे देशातून या सायकलिंग क्रीडा प्रकाराचे चाहते आहेत, त्यांच्यापर्यंत या स्पर्धेच्या निमित्ताने पुणे येथील निसर्गसौंदर्य, संस्कृती,परंपरा या सर्व गोष्टी जगभरात पोहचण्यास मदत होणार असून त्यातून पर्यटन आणि उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित होण्याची संधी आहे. तसेच पुण्याच्या ग्रामीण भागात शाश्वत विकास आणि कनेक्टिव्हिटी, तंदुरुस्ती आणि पर्यावरण जागरूकतेची संस्कृती वाढवण्यास सहायक असलेली ही सायकलिंग स्पर्धा लोकांना आरोग्यदायी जीवनशैली स्विकारण्यास प्रोत्साहन देणारी पूरक वातावरण निर्माण करणारी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सायकलिंगचे शहर अशी पुण्याची ओळख आहे. ती वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न या करारातून होईल. आंतरराष्ट्रीय सायकलिंगसाठी पुणे शहराचे योगदान मोठे आहे.

# महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर

## नागरिकांनी दक्ष राहण्याची अपेक्षा – नीलम गोऱ्हे

**वृत्तसंस्था/पुणे**



कोंढवा येथील उच्चभ्रू आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या गेटेड सोसायटीत एका २५ वर्षीय महिलेवर झालेल्या बलात्काराच्या अमानुष घटनेनंतर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे शहर पोलिस आयुक्तांकडे तत्काळ आणि प्रभावी कारवाईची मागणी केली आहे. या घटनेनंतर शहरातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, २ जुलै २०२५ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास एका गेटेड सोसायटीमध्ये एका व्यक्तीने स्वतःला कुरिअर बॉय म्हणून दर्शवत प्रवेश मिळवला आणि पीडितेच्या घरी जाऊन तिला बेशुद्ध करून तिच्यावर बलात्कार केला. यानंतर आरोपीने पीडितेच्या मोबाईलवर धमकीवजा मेसेज ठेवून निर्ढावलेपणा दाखवला. डॉ. गोऱ्हे यांनी याप्रकरणी विशेष तपास पथकाची तत्काळ स्थापना करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली हे पथक कार्यरत करून घटनेचा सखोल तपास केला जावा, असे त्यांनी सुचवले आहे.

तसेच, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवून त्याला तत्काळ अटक करण्यात यावी आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत तसेच भारतीय न्याय संहितेतील इतर तरतुदी अंतर्गत गुन्हा दाखल करून अनुभवी विधी अधिकाऱ्यांच्या मदतीने लवकरात लवकर चार्जशीट दाखल करावी, अशी त्यांनी सूचना केली आहे. या घटनेनंतर सोसायटीमधील सुरक्षाव्यवस्थेची त्रुटी स्पष्टपणे समोर आली असल्याने डॉ. गोऱ्हे यांनी सुरक्षारक्षक, रजिस्टर नोंदी व प्रवेश नियंत्रण यंत्रणेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

पुढील काळात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून त्यांनी सर्व गेटेड सोसायट्यांमध्ये प्रवेश नोंदणी सक्तीची करणे, बायोमेट्रिक किंवा डिजिटल लॉग प्रणाली अनिवार्य करणे आणि महिला सुरक्षेसाठी हेल्पलाइन क्रमांक सोसायटीमध्ये दिसेल अशा पद्धतीने लावणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. तसेच, पोलिस प्रशासनाने सोसायटी सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे तयार करून सर्व सोसायट्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करावी, अशीही त्यांनी सूचना केली आहे.

ही घटना केवळ एका महिलेवर झालेला अत्याचार न राहता संपूर्ण शहरातील महिलांच्या सुरक्षेला गालबोट लावणारी आहे. म्हणूनच, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अशा घटनांच्या पुनरावृत्तीला आळा बसावा यासाठी तत्काळ आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## बोधगयातील आंदोलनासाठी वंचितचे कार्यकर्ते रवाना

**वृत्तसंस्था/अकोला**

बोधगया येथे सुरू असलेल्या महाबोधी मुक्ती आंदोलनात वंचित बहुजन युवा आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर हे येत्या ५ जुलै रोजी सहभागी होणार आहेत. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी अकोला वंचित बहुजन युवा आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते रवाना झाले असून, बोधगया महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यासाठी सुरू असलेल्या लढ्याला ताकद देण्यासाठी ही उपस्थिती असणार आहे. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते बाळासाहेब आंबेडकर, भीमराव आंबेडकर यांनी आधीच भेट देऊन या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दर्शवला आहे. बौद्ध समाजाच्या हक्कासाठी चालू असलेल्या या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी कार्यकर्ते सहभागी होत आहेत.

# आदित्य ठाकरेंना क्लीनचिट!

## दिशा सालियनप्रकरणी चौकशीत कोणताही गुन्हा आढळला नाही

**वृत्तसंस्था/मुंबई**

अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनने आत्महत्या केली आहे आणि तिच्या मृत्यूमध्ये कोणताही गुन्हा आढळला नाही, असे प्रतिज्ञापत्र मुंबई पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयात सादर केले आहे. या प्रकरणात माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्यावर मोठ्या प्रमाणात आरोप झाले होते. मात्र, आता पोलिसांनी दाखल केलेला प्रतिज्ञापत्रानंतर आदित्य ठाकरे यांना क्लीन चिट मिळाली आहे.

### पुढील सुनावणी १६ जुलैला

**बुधवारी न्यायाधीश ए. एस. गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीसाठी आली. आता पुढील सुनावणी १६ जुलै रोजी ठेवली आहे. पोलिसांनी, ज्यांनी या प्रकरणाची प्रथम चौकशी केली, त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की दिशा सालियनने आत्महत्या केली आहे.**

दिशा सालियनने स्वतःच्या इच्छेने फ्लॅटच्या खिडकीतून उडी मारली होती आणि पोस्टमॉर्टम अहवालात मृतावर लैंगिक किंवा शारीरिक हल्ल्याचे कोणतेही चिन्ह नसल्याचे पोलिसांनी गेल्या महिन्यात उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. कुटुंबाशी झालेल्या वादामुळे आणि तिचे व्यवसायिक व्यवहार व्यवस्थित होत नसल्याने ती प्रचंड मानसिक तणावाखाली होती, असे पोलिसांनी प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका निवासी इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. त्यानंतर शहर पोलिसांनी अपघाती मृत्यू अहवाल (एडीआर) नोंदवला होता.

मालवणी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, दिशा सालियन तिच्या कुटुंबाशी असलेल्या वादामुळे आणि तिच्या व्यावसायिक व्यवहारांमुळे प्रचंड मानसिक तणावाखाली होती. घटनेच्या वेळी ती दारूच्या नशेत होती आणि त्यावेळी तिच्यासोबत असलेल्या तिच्या मंगेतरानेही कोणताही गैरप्रकार किंवा संशय नाकारला होता, असे त्यात म्हटले आहे.

# मुंबईत ईडीच्या कारवाईत कोट्यवधींचे घबाड

## बँकेतील १२ कोटी रुपये व मुदत ठेवी गोठविल्या

**वृत्तसंस्था/मुंबई**

सक्त वसुली संचलनायाने (ईडी) बांधकाम घोटाळ्याप्रकरणी मंगळवारी वसई, विरारमधील वास्तुविषारद, बांधकाम व्यावसायिक आणि सनदी लेखापाल यांच्या निवासस्थानी टाकेलल्या छाप्यातून कोट्यवधी रुपयांचे घबाड हाती लागले असून अत्यंत महत्त्वाची आणि गोपनीय कागदपत्रे ईडीने ताब्यात घेतली आहेत. या कारवाईत बँकेतील १२ कोटी रुपये रक्कम आणि मुदत ठेवी गोठविण्यात आल्या असून २६ लाख रुपये रोकड जप्त करण्यात आली आहे. या बांधकाम घोटाळ्यात पालिका अधिकारी, बांधकाम व्यावसायिक आणि वास्तुविषारदांचे संगनमत असल्याचे पुरावे ईडीच्या हाती लागले आहेत.

नालासोपारा येथील ४१ अनधिकृत इमारती प्रकरणामध्ये सक्त वसुली संचलनालयाने कारवाई सुरू केली आहे. मे महिन्यात केलेल्या कारवाईत पालिकेचे निलंबित नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्या निवासस्थानातून सुमारे ९ कोटी रुपये रोख रक्कम आणि २३ कोटी रुपयांचे सोने जप्त करण्यात आले होते.याप्रकरणी मनी लॉड्रींगचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता.

रेड्डी यांच्या चौकशीतून शहरातील बडे बांधकाम व्यावसायिक, वास्तुविषारद (आर्किटेक्ट), सनदी लेखापाल (सीए) आदींची नावे समोर आली होती. त्यानुसार मंगळवारी शहरातील १६ ठिकाणी छापे टाकण्यात आले होते. या कारवाईदरम्यान ईडीच्या अधिकाऱ्यांनी अनेक लॅपटॉप, आयपॅड, मोबाइल फोन जप्त केले. यामध्ये अत्यंत महत्त्वाचे पुरावे आढळले आहेत. त्यात गोपनीय कागदपत्रे, मालमत्तांचे दस्तावेज, पावत्या, करारनामे, तसेच ध्वनीफित (ऑडीयो रेकॉर्डींग) आदींचा समावेश आहे.

### आरक्षण हटवल्याने ईडीचे लक्ष

**नालासोपाऱ्यातील कचराभूमी (डंपिंग ग्राऊंड) आणि सांडपाणी प्रकल्पासाठी (एसटीपी) आरक्षित जागेवर भूमाफियांनी बनावट बांधकाम परवानगी (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) बनवून ४१ अनधिकृत इमारती बांधल्या होत्या. यामध्ये अडीच हजार कुटुंबियांना फसवणूक करून घरे विकण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जानेवारी २०१५ मध्ये या ४१ इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. तेथे हे प्रकल्प सुरू करणे अपेक्षित असताना फेब्रुवारी महिन्यात दोन्ही आरक्षणे हटविण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. या प्रस्तावावर तत्कालीन नगररचना उपसंचालक वाय.एस.रेड्डी यांची स्वाक्षरी होती. या प्रकरणात अनेक गुन्हे दाखल झाल्यानंतर ईडीचे मनी लॉड्रींगचा गुन्हा दाखल करून चौकशी सुरू केली आहे.**

या पुराव्यांच्या आधारे अनेक जण चौकशीच्या फेऱ्यात येणार असल्यचा ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. शहरातील इमारतींना बांधकाम परवानगी देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असल्याचे यातून उघड झाल्याचे ईडीने म्हटले आहे. बांधकाम घोटाळ्यातील काळा पैसा पालिकेत वळवला जात होता, असे निरीक्षण ईडीने नोंदवले आहे.

## मनोरंजन

# रूपम शर्मा 'कुमकुम भाग्य'मध्ये सोनालिकाच्या भूमिकेत



**मुंबई** : झी टीव्हीवरील लोकप्रिय शो 'कुमकुम भाग्य' भावनिक खोलपणा आणि अनपेक्षित वळणांमुळे प्रेक्षकांच्या मनात आपले स्थान टिकवून आहे. शिवांश (नमिक पॉल) आणि प्रार्थना (प्रणाली राठोड) आता मनापासून खऱ्या नात्याची सुरुवात करत आहेत, पण भूतकाळातील एक स्फोटक रहस्य त्यांच्या आयुष्यात वादळ घेऊन येण्याची शक्यता आहे. सूडाने सुरू झालेले लग्न आता हळूहळू प्रेमळ काळजीत बदलत आहे– पण सोनालिका खूप आशेने परत येते, पण तिला अजिबात कल्पना नाही की तिला किती मोठ्या वादळाला सामोरे जावे लागणार आहे. प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रूपम शर्मा या शोमध्ये सोनालिका या भूमिकेत प्रवेश करत आहेत. तिचे आधी शिवांशसोबत लग्न होणार होते, पण शिवांशचे लग्न आता प्रार्थनाशी झाले आहे, ही गोष्ट तिला माहिती नाही. घरातील एका पारंपरिक पूजा कार्यक्रमादरम्यान तिचा प्रवेश होतो. तिला वाटतं की ती सगळ्यांशी सहज जुळवून घेईल, पण जेव्हा तिला सत्य समजतं, तेव्हा तिचं जगच कोलमडून जातं. नाट्य वाढवण्यासाठी रूपम खलनायकी भूमिकेत दिसणार आहे, जिथे सोनालिकाची उपस्थिती केवळ भावनांनाच नव्हे तर या दोघांच्या नव्याने उभ्या राहत असलेल्या नात्यालाही हादरवून टाकणार आहे.



## दीपिका पदुकोणचे 'हॉलिवूड वॉक ऑफ फेम'वर नाव!

**मुंबई** : दीपिका पदुकोण केवळ बॉलिवूडमधील सुपरस्टार नाही, तर एक जागतिक स्तरावरील आयकॉन आहे. हॉलिवूड चेंबर ऑफ कॉमर्सकडून तिला प्रतिष्ठित हॉलिवूड वॉक ऑफ फेमवर स्टार प्रदान करण्यात आला आहे. हा मान मिळवणारी ती पहिली भारतीय कलाकार ठरलीय. दीपिकाचा हा सन्मान एमिली ब्लंट, टिमोथी चालमेट, रामी मालेक, रॅचेल मॅकअॅडम्स, स्टॅनली टुच्ची, डेमी मूर यांसारख्या आंतरराष्ट्रीय नामवंत कलाकारांसोबत यंदाच्या यादीत त्यांचे नाव घेतले जात आहे.

## सुम्बुल तौकीर खान सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी'मध्ये प्रमुख भूमिकेत



**मुंबई** : सर्व वयोगटातील प्रेक्षकांना भावतील अशी हृदयस्पर्शी आणि संबद्ध कथानके सादर करणारी वाहिनी म्हणून सोनी सबची ख्याती आहे. या वाहिनीवर लवकरच एक नवीन कौटुंबिक नाट्य इत्ती सी खुशी सादर होणार आहे आणि या मालिकेत प्रमुख भूमिका करणार आहे एक अत्यंत गुणी अभिनेत्री, सुमबुल तौकीर खान. पडद्यावरची प्रभावी उपस्थिती आणि अभिनयातील गहिरेपण हे सुम्बुलच्या अभिनयाचे ठळक विशेष आहेत. ती या मालिकेत अन्विता दिवेकर ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल. मुंबईच्या पार्श्वभूमीवरील 'इत्ती सी खुशी' ही मालिका अन्विता या २१ वर्षीय मुलीची गोष्ट आहे. सहा भावंडांमध्ये सर्वात मोठ्या असलेल्या अन्वितावर अचानक आपल्या कोसळणाऱ्या कुटुंबाला सावरण्याची जबाबदारी येऊन पडते. तिचे वडील दारूच्या व्यसनाशी झगडत आहेत आणि आई त्यांना सोडून गेली आहे. अशा वेळी अन्विताच आपल्या कुटुंबाला एकत्र बांधून ठेवते आहे. आपल्या भावंडांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तिने स्वतःचे शिक्षण आणि आशा-आकांक्षा बाजूला सारल्या आहेत. तिचा दैनंदिन अस्तित्वाचा संघर्ष, मूक बलिदान आणि तिच्यातील प्रेम आणि चिकाटी या मालिकेत बघायला मिळेल.

# १.०३ लाख कोटींच्या संरक्षण साहित्य खरेदीला मंजुरी

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारताच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने १.०३ लाख कोटी रुपयांची शस्त्रे आणि लष्करी उपकरणे खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. यात भूदल, नौदल आणि हवाई दलासाठी आर्म्ड रिकव्हरी व्हेईकल्स, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टीम, जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे यांचा समावेश आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने (डीएसी) १० संरक्षण साहित्य खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि भारतीय सैन्य दलांना कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यासाठी कायम सुसज्ज ठेवणे या उद्देशाने ही खरेदी होणार आहे. या खरेदीमुळे शत्रूचा वेगाने आणि प्रभावीरित्या प्रतिकार करण्याची भारतीय सैन्याची क्षमता आणखी वाढणार आहे. भारताचे हवाई संरक्षण आणखी मजबूत होणार आहे. संरक्षण साहित्य निर्मिती ते सैन्याला होणारा पुरवठा यासाठीच्या साखळीचे व्यवस्थापन आणखी प्रभावीरित्या होणार आहे.

### सैन्याला मिळणार जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे व वाहने

### स्वदेशी संरक्षण उद्योगांना चालना मिळणार

**भारतीय सशस्त्र दलासाठी खरेदी करण्यात येणार ही सर्व उपकरणे आणि प्रणाली स्वदेशी बनावटीची असतील. ते भारतातच डिझाइन, विकसित आणि उत्पादित केले जातील. यामुळे 'मेक इन इंडिया' अंतर्गत देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला मोठी चालना मिळेल आणि परकीय आयातीवरील भारताचे अवलंबित्व देखील कमी होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.**

सैन्यासाठी खरेदी केल्या जाणार असलेल्या संरक्षण साहित्यात पाणसुरुंग शोधून निकामी करणारे जहाज, अत्याधुनिक शस्त्रे, पाण्याखाली प्रभावी काम करणाऱ्या यांत्रिक बोटी, उंचावर शस्त्र ठेवून वेगाने गोळीबार करण्यासाठी आवश्यक साहित्य अशा अनेक आधुनिक संरक्षण साहित्यांचाही समावेश आहे. यामुळे नौदलाच्या जहाजांचे तसेच व्यावसायिक जहाजांचे रक्षण करण्यास मदत होणार आहे.

# 'त्या'साठी विमा कंपनी भरपाई देण्यास बांधील नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

बेफिकीरपणे आणि वेगाने वाहन चालवणाऱ्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. स्वतःच्या चुकीमुळे झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना विमा कंपनीकडून भरपाई मिळणार नाही, असा स्पष्ट निकाल न्यायालयाने दिला आहे.

ही सुनावणी एन.एस. रवीश यांच्याशी संबंधित प्रकरणावर होती. १८ जून २०१४ रोजी रवीश हे आपल्या वडील, बहीण आणि मुलांसह कारने प्रवास करत असताना मालनहल्लीजवळ त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटले आणि अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, रवीश हे वेगात आणि बेपर्वाईने गाडी चालवत होते, त्यामुळे अपघात झाला. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला.

शेवटी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या प्रकरणाचा पुनर्विचार करत उच्च न्यायालयाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. खंडपीठाने म्हटले की, जेव्हा अपघात मृत व्यक्तीच्या निष्काळजीपणामुळे होतो, तेव्हा विमा कंपनीवर कोणतीही भरपाईची जबाबदारी राहात नाही.

### न्यायाधिकरणानेही दावा फेटाळून लावला

**एन. एस. यांच्या मृत्यूनंतर पत्नी, मुलगा आणि पालकांनी विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. मात्र, पोलिसांच्या आरोपपत्रात रवीश यांच्यावर अपघातासाठी थेट जबाबदार ठरवण्यात आले. यानंतर मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने (एमएसीटी) त्यांचा दावा फेटाळून लावला. पुढे त्यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात अपील दाखल करत अपघात टायर फुटल्यामुळे झाल्याचा दावा केला. परंतु उच्च न्यायालयानेही स्पष्ट केले की, मृत व्यक्ती निष्काळजीपणामुळेच अपघाताला कारणीभूत ठरली असून विमा कंपनी भरपाई देण्यास बाध्य नाही.**

या निर्णयामुळे भविष्यकाळात वाहनचालकांना अधिक जबाबदारीने व सुरक्षितपणे वाहन चालवण्याचा संदेश दिला गेला असून, विमा दाव्यांबाबतही स्पष्टता निर्माण झाली आहे.

# एकादशीला पंढरपुरात वारकरी महाअधिवेशन

**वृत्तसंस्था/पंढरपूर**

प्रतिवर्षी लक्षावधी वारकरी आषाढी, कार्तिकीच्या निमित्ताने पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होतात. लोचनात त्रिभुवन अवघे लेकरांस गवसून जाय माझी पंढरीची माय, माझी पंढरीची माय, असे म्हणत वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरपूर येथे विसावत आहेत. वारकरी संप्रदायाचे धर्मकार्य आणि राष्ट्रनिष्ठा ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. गेली अनेक शतके वारकरी संप्रदाय नैतिक मूल्ये, संस्कृतीरक्षण आणि देशभक्ती यांची शिकवण देत आला आहे. आजच्या काळातही धर्म, संस्कृती आणि राष्ट्र यांच्या हितासाठी वारकरी समाज अग्रभागी आहे. महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणात असूनही अद्याप पंढरपूर आणि आळंदी येथील तीर्थक्षेत्रांना म्हणाव्या अशा सुविधा नाहीत. याचसमवेत आळंदी येथे प्रस्तावित असलेला कत्तलखाना, वारीत होणारी घुसखोरी, संतांच्या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून लोकांची दिशाभूल करणे यांसह अन्य प्रश्नांचा वाचा फोडणे यांसह जाज्वल्य भक्ती अन् राष्ट्रनिष्ठा यांच्या भूमिकेतून, वारकरी ऐक्य साधून महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे कराव्यात, यासाठी



एकादशीला (६ जुलैला) पंढरपूर येथे वारकरी महाअधिवेशन घेण्यात येणार आहे.

हे अधिवेशन सद्गुरू श्री गंगागिरी महाराज मठ, भक्तीमार्ग, जनकल्याण हॉस्पिटलच्या शेजारी, पंढरपूर येथे दुपारी १ ते ३.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज या अधिवेशनाचे अध्यक्ष असून या अधिवेशनात ज्येष्ठ कीर्तनकार संतवीर ह.भ.प. बंडातात्या कराडकर, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वरशास्त्री महाराज आणि सचिव ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. माणिक महाराज मोरे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, ह.भ.प. छोटे कदम माऊली, ह.भ.प. नरेंद्र महाराज मस्के, श्रीक्षेत्र अपेगाव येथील ह.भ.प. विष्णु महाराज अपेगावकर, अखिल भारतीय संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती महाराज, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे कोकण प्रांताध्यक्ष ह.भ.प. भगवान महाराज कोकरे, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. मारुती महाराज तुनतुने आणि कार्याध्यक्ष ह.भ.प. बापू महाराज रावकर, हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगडचे राज्य संघटक सुनील घनवट यांसह संत- महंत, ह.भ.प., धर्माचार्य, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.

हे दैनिक, **लोकशाही पब्लिकेशन्स प्रा. लि.** करिता **प्रकाशक - सौ. प्रज्ञा संजय हेडा** यांनी, **मुद्रक - श्री. अरुण श्यामराव जोशी** यांच्या, देश पब्लिकेशन, इ-30 /2, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मागे, हिंगणा एम.आय.डी.सी. नागपूर - 440016 येथे मुद्रित करून, थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह - II, 148, युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ, नागपूर - 440010 येथे प्रसिद्ध केले. **RNI No.- MAHMAR/2010/35482. व्यवस्थापकीय संचालक - * सौ. प्रज्ञा संजय हेडा** ( * पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) **दूरध्वनी क्र. 0712-2424244, 0712-4043332.**
**E-Mail : editorial@lokshahivarta.in.** (लोकशाही वार्तामधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. तसेच लोकशाही वार्ताशी संबंधित कुठलेही वाद केवळ नागपूर न्यायालयाच्या कार्यक्षेत्रतच राहतील.)

# ई-रिक्षा चालकाचा आत्मदहनाचा प्रयत्न

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील प्रकार, पोलिसांच्या सतर्कतेमुळे टळला अनर्थ

**लोकशाही वार्ता/बुलढाणा**

जिल्हा प्रशासनाचे व जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बुलढाणा शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका व्यक्तीने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी शहर पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी त्याला वेळीच रोखत ताब्यात घेतल्याने संभाव्य अनर्थ टळला. यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांनी काही काळ खळबळ उडाली. भर वाहतुकीच्या जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर गुरुवारी (दि.३ जुलै) दुपारी हा खळबळजनक घटनाक्रम घडला. प्रदीप गोरे (४८, रा. सुंदरखेड, ता. जि. बुलढाणा) असे आत्मदहनाचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. तो ई रिक्षा चालक आहे.



आपल्यासह अन्य समव्यावसायिक चाळीस व्यक्तीवरील अन्यायाच्या निषेधार्थ आणि जिल्हा प्रशासनाकडे मागणी करूनही न्याय मिळत नसल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. या प्रकरणी आज आत्मदहन करण्याचा इशारा त्याने दिला होता. यामुळे बुलढाणा शहर पोलीस ठाण्याचे साध्या वेशातील कर्मचारी सकाळपासूनच जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तैनात होते. गुरुवारी दुपारी प्रदीप गोरे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आला. त्याने सोबत पाण्याच्या बाटलीमध्ये पेट्रोल आणले होते. लपवून आणले पेट्रोल त्याने बाहेर काढताच साध्या वेशातील पोलिसांनी त्यावर झडप घालून त्याला ताब्यात घेतले. त्याच्या जवळील पेट्रोलची बॉटल जप्त करण्यात आली. जुजबी चौकशी केल्यावर पोलिसांनी वाहनात टाकून त्याला बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात नेले.

### न्याय मागणीसाठी उचलले टोकाचे पाऊल

**शहरातील मयुरी कंपनीच्या ई रिक्षामध्ये बसवण्यात आलेल्या बॅटरी दर्जाहीन असल्याचा आरोप करत, वॉरंटी असून देखील संबंधित विक्रेत्याकडून ह्या बॅटरी बदलून दिल्या जात नाहीत, कंपनीसह अधिकृत विक्रेत्यांकडून टाळाटाळ केली जात आहे. यामुळे रिक्षा चालकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. या संदर्भात तीस ते चाळीस इ रिक्षा चालकांनी १८ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून, न्याय मिळण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती. मात्र अजूनही त्यांना बॅटरी बदलून मिळत नसल्याने गुरुवारी प्रदीप गोरे या रिक्षा चालकाने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने आत्मदहनाच्या प्रयत्नात असलेल्या विजय गोरे याला बुलढाणा शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

# मसाज सेंटरच्या आड देहविक्रीचा व्यवसाय

## नेक्स्ट लेव्हल मॉलमधील घटना तीन परप्रांतीय तरुणी आढळल्या



**लोकशाही वार्ता/अमरावती**

शहरातील कॅम्प परिसरातील गर्ल्स हायस्कूल चौकातील नेक्स्ट लेव्हल मॉलमध्ये मसाज (स्पा) सेंटरआड सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायाचा गुन्हे शाखेच्या युनिट दोनने धाड टाकून पर्दाफाश केला. ही कारवाई बुधवारी (दि.२ जुलै) सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास केली. या कारवाईदरम्यान पोलिसांना या स्पा सेंटरमध्ये तीन परप्रांतीय तरुणी व तीन ग्राहक दिसले. या प्रकरणी स्पा सेंटरचा मालक, जागेचा मालक व स्पा व्यवस्थापकाविरुद्ध 'पिटा' कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

नेक्स्ट लेव्हल मॉलमध्ये पहिल्या माळ्यावर 'स्पा ९९' नावाने एक सेंटर आहे. या सेंटरमध्ये 'स्पा'च्या आड देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पीआय संदीप चव्हाण यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पीआय चव्हाण, एपीआय महेश इंगोले व त्यांच्या पथकाने एक 'डमी' ग्राहक स्पा सेंटरमध्ये पाठवून त्याबाबत खातरजमा केली. त्यावेळी स्पा सेंटरमध्ये देहयविक्रीचा खुलेआम व्यवसाय सुरू असल्याचे समोर आले.

त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट दोनने या स्पा सेंटरवर धाड टाकली. त्यावेळी स्पा सेंटरमध्ये तेथे असलेली तरुणी व ग्राहक हे आक्षेपार्ह अवस्थेत आढळले.

या प्रकरणी पोलिसांनी प्राथमिक चौकशी केली असता स्पा सेंटरचा व्यवस्थापक निरजसिंग भंवरसिंग पंड्या (३५, रा. दस्तुरनगर) याच्या सांगण्यावरुन स्पा सेंटरचा मालक राकेश रावत (४२, रा. रतलाम, मध्यप्रदेश) आणि हे मसाज सेंटर ज्या जागेत सुरू होते, त्या मसाज सेंटरच्या आड देहविक्रीचा जागेचा मालक अभिजित लोखंडे (४०, रा. रहाटगाव, अमरावती) यांच्याविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली होती.

### अन्य सेवेसाठी २ ते ५ हजार

**स्पा सेंटरवर जाणाऱ्या ग्राहकांना स्पासाठी (मसाज) २ हजार रुपये घेतले जात होते. याचवेळी मसाजव्यतिरीक्त इतर सेवांचा लाभ घेण्यासाठी संबधित ग्राहकाला किमान २ हजार रुपयांपासून ते पाच हजार रुपयांपर्यंत चार्ज द्यावा लागत होता. अशी माहिती पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आली आहे.**

### अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई

**स्पा सेंटरच्या नावे देहव्यापार सुरू असल्याचे कारवाईदरम्यान समोर आले आहे. आम्ही याप्रकरणी स्पा व्यवस्थापकाला ताब्यात घेतले असून, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करणार आहोत. या प्रकरणात पिटा (अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा) अन्वये कारवाई केली आहे, अशी माहिती गुन्हे शाखा युनिट दोनचे पीआय संदीप चव्हाण यांनी दिली आहे.**

# रेल्वेच्या बोगीतील शौचालयात आढळला मृतदेह

**लोकशाही वार्ता/अकोला**

अकोल्यातील रेल्वे स्टेशनवर पुणे अमरावती एक्सप्रेसच्या शौचालयात एक व्यक्ती मृतावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. रमेश चौधरी असे मृतकाचे नाव असून रेल्वे तील बी टू या बोगीच्या शौचालयाचा दरवाजा उघडत नसल्याचे प्रवाशांकडून रेल्वे पोलिस आणि रेल्वे प्रशासनाला याची माहिती देण्यात आली. दरम्यान ,दरवाजा उघडताच रमेश महादेवराव चौधरी हे मृतावस्थेत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी खात्री करण्यासाठी मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालय अकोला येथे हलवले असता डॉक्टरांनी त्यांना



मृत घोषित केले आहे. सदर व्यक्ती अमरावती जिल्ह्यातील असून मृतकाचा मुलगा राहुल चौधरी यांना फोनद्वारे माहिती देण्यात आली. मृतक रमेश चौधरी हे पुणे येथे त्यांच्या मुलासोबत राहत असल्याची माहिती समोर आली आहे.

# भंडाऱ्याचे माजी शिक्षणाधिकारी सलामे यांना अटक

## शिक्षक भरती घोटाळा : ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी

**लोकशाही वार्ता/भंडारा**

शिक्षक भरती घोटाळ्यात अटकसत्र सुरू असतानाच सदर पोलीस ठाण्यात आणखी एका अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद भंडारा (सध्या नेमणूक शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय गडचिरोली) कार्यालयातील अधीक्षक आरोपी रवींद्र पंजाबराव सलामे यांना गुरुवारी अटक करण्यात आली.

सलामे यांच्यावर नागपूर पोलिसांत भादंविचे विविध कलमान्वे गुन्हा दाखल करून



अटक करण्यात आली असून ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. शिक्षक भरती घोटाळ्यातील आरोपी पराग नानाजी पूडके (रा. लाखनी) हा कधीही कोणत्याही शाळेमध्ये सहाय्यक शिक्षक पदावर नियुक्तीच नसताना त्याचे नानाजी पूडके विद्यालय, जेवनाळा ता. लाखनी या शाळेतील मुख्यध्यापक पदाचे नियुक्ती देण्यात आली.

याकरीता त्याने शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नागपूर यांचे बनावट नियुक्ती मान्यता आदेश, सेवा सातत्य, एस के. बी. शाळा, यादव नगर, नागपूर या शाळेचे लेटरहेडवर बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर करीत गुन्ह्यातील अटक आरोपी महेंद्र म्हैसकर याचेसोबत कट कारस्थान रचून व गैर व्यवहार करून तयार केले. हे बनावटी कागदपत्रे त्याने सलामे यांच्याकडे प्रस्ताव म्हणून सादर केले होते.

### घोटाळ्याची एसआयटी चौकशी होणार

**संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या बनावट शालार्थ आयडी घोटाळ्याची या विषयाची समज आणि ज्ञान असणाऱ्या वरिष्ठ आयएएस तसेच आयपीएस अधिकाऱ्यांची एसआयटी स्थापन करून चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मंगळवारी विधानसभेत केली.**

# गोंदिया जिल्हा बँकेत सहकार पॅनलचे वाढले बळ

## जिल्हा बँक निवडणूक : परिवर्तन पॅनलच्या दोन संचालकांनी दिले समर्थन

**लोकशाही वार्ता/गोंदिया**

गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनलने सर्वाधिक ११ जागा जिंकत जिल्हा बँकेवर वर्चस्व स्थापन केले. यानंतर परिवर्तन पॅनलच्या दोन संचालकांनी सहकार पॅनलला समर्थन दिले. त्यामुळे जिल्हा बँकेत सहकार पॅनलचे बळ वाढले असून, आता अध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे. परिवर्तनच्या दोन संचालकांनी सहकारला समर्थन दिल्याने यांना सहकारनेच परिवर्तनच्या माध्यमातून निवडणूक जिंकण्याकरीता पाठविल्याचीही चर्चा सुरू झाली आहे.

गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या एकूण २० संचालकांसाठी निवडणूक पार पडली. २९ जून रोजी मतदान आणि ३० जून रोजी मतमोजणी करण्यात आली. यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने सहकार पॅनल तर काँग्रेस आणि इतर पक्षांनी मिळून परिवर्तन पॅनल तयार करुन ही निवडणूक लढविली होती. यात सहकार पॅनलने सर्वाधिक ११ जागा जिंकत जिल्हा बँकेवर वर्चस्व स्थापन केले. तर परिवर्तन पॅनलने ९ जागा जिंकत आपली ताकद दाखवून दिली. चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत खा. प्रफुल्ल पटेल, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले यांची सुध्दा प्रतिष्ठा पणाला लागली होती. यात अखेर खा. पटेल यांनी बाजी मारली.

# विठ्ठल दर्शनासाठी खामगावहून हरिभक्तांची रेल्वे पंढरपूरकडे रवाना

**वृत्तसंस्था/बुलढाणा**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या सोयीसाठी आज खामगाव येथून विठ्ठल दर्शन एक्सप्रेस ही विशेष रेल्वे मोठ्या जयघोषात आणि भक्तीमय वातावरणात पंढरपूरकडे रवाना झाली. या पहिल्या फेरीत एकूण १६२९ भाविक सहभागी झाले होते. रेल्वेला केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते खामगाव रेल्वे स्थानकावरून हिरवी झेंडी दाखवून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, सागर फुंडकर उपस्थित होते. या वारकऱ्यांना खामगावकरांनी विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठलच्या गजरात हजारोंच्या संख्येने निरोप दिला.

स्टेशन परिसरात भक्तीरसात न्हालेली गर्दी, टाळ-मृदुंगाच्या गजरात गाणारे वारकरी, व विविध संघटनांकडून करण्यात आलेले अल्पोपहार व पाण्याचे वाटप यामुळे संपूर्ण परिसर भक्तिभावाने न्हालेला होता.

# ती रडते, समोर येते अन् मारते?

## व्हायरल व्हिडिओमुळे भीतीचे वातावरण

**लोकशाही वार्ता/अमरावती**

अंधाराचा फायदा घेत ती काळा कपडे परिधान केलेली स्त्री पहिल्यांदा रडण्याचा आवाज काढते. नंतर ती अचानकपणे समोर येते आणि समोरील व्यक्तीला मारते. हे खरं की खोट हे त्या व्यक्तीला माहिती पण, असा व्हिडिओ अमरावती शहरात व्हायरल होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीमुसार, अमरावती शहरात छत्री तलाव परिसरात घडलेल्या एका घटनेचे व्हिडिओ खूप जोरात व्हायरल होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही युवक आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी रात्रीच्या वेळी छत्री तलाव या निसर्ग रम्म वातावरणात मित्रा सोबत गेला असता त्याला अचानक एका स्त्री भूतनीचा रडण्याचा आवाज ऐकू येतो. कोण रडते म्हणून पाहण्यासाठी गेला असता त्याला स्त्री भूतनी एका काळा कपड्यांमध्ये दिसते आणि त्याला मारते, असे व्हायरल झालेल्या फोटो



मध्ये दिसत आहे. दरम्यान, या व्हिडिओमध्ये संपूर्ण अंधार असून त्यामध्ये फक्त एका स्त्री भूतनीचाचा रडण्याचा आवाज ऐकू येतो.

या व्हायरल फोटो व्हिडिओ मुळे संपूर्ण भयभीत वातावरण निर्माण झाले असून सायबर पोलिस व्हायरल झालेल्या फोटो व्हिडिओचा तपास करत आहे. नागरिकांनी या व्हायरल झालेल्या फोटो व्हिडिओ वर विश्वास ठेऊ नये असे आवाहन पोलिसांनी केले आहे. ज्या गोष्टी अस्तित्वात नाही त्यामुळे समाजामध्ये दहशतीचे व भीतीचे वातावरण निर्माण होत आहे, अशाप्रकारे अफवा पसरवणे कायदेशीर गुन्हा आहे. पोलिस प्रशासनाने अशा प्रकरणाची तत्काळ दखल घ्यायला पाहिजे तर लोकांनी देखील अशा अफवावर विश्वास ठेवू नये असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अमरावती जिल्हा संघटक हरीश केदार यांनी केले आहे.

# पोंभुर्णा औद्योगिक वसाहतीबाबत शासन सकारात्मक

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

चंद्रपूर जिल्ह्यातील कोसंबी पेठ ता. पोंभुर्णा येथे औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत शासन सकारात्मक आहे. या औद्योगिक वसाहतीसाठी १०२.५० हेक्टर जमिनीची आवश्यकता असून संपादनासाठी सहा कोटी सात लाख ५२ हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यापैकी ४२.५९ हेक्टर जमीन संपादनाला थेट खरेदीद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित भूसंपादन प्रक्रिया ६० दिवसात पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी गुरुवारी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली. पोंभुर्णा औद्योगिक वसाहतीसाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देणेबाबत जिल्ह्यातील आमदारांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. चर्चेच्या उत्तरात राज्यमंत्री नाईक म्हणाले की, थेट खरेदीद्वारे मान्यता दिलेला ४२.५९ हेक्टर जमिनीसाठी २५ शेतकऱ्यांना दोन कोटी ३५ लक्ष रुपयांचा मोबदला देण्यात आलेला आहे. तसेच १९ शेतकऱ्यांना मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याचप्रमाणे ३४.३८ हेक्टर जमिनीचा निवडस्तरावर असून याच वर्षी ही जमीन संपादित करण्यात येणार आहे.


Nagar Panchayat Mouda
Dist. Nagpur
Email – npmouda@gmail.com

No. 2242/NPM/SD/2025 Dt. 03/07/2025

**Notice for Tender (Third Call)**

Chief Officer, Nagar Panchayat Mouda, Dist Nagpur, invites proposals from reputed companies to participate in the competitive bidding process to Perform tasks under Solid Waste Management work such as household refuse removal, maintaining drains and roads, spraying, and toilet upkeep, all of which are to be executed under the authority of Nagar Panchayat Mouda, ensuring proper environmental upkeep and public health standards in the area.

For the detailed Tender document, interested bidder should visit http://mahatenders.gov.in, Tender submission would be online and the deadline to submit the proposals is Dt.14/07/2025 (04.00 pm)

Sd/-
Dr. Vivek Meshram
Chief Officer
Nagar Panchayat Mouda


# मजूर असल्याचे बोगस कामगारांना प्रमाणपत्र

## संगणक चालकासह दोघांवर गुन्हे दाखल, कामगार कार्यालय पथकाची कारवाई

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

बोगस कामगारांना मजूर असल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या कळंब व राळेगाव येथील संगणक चालकावर कामगार अधिकारी कार्यालयाच्या पथकाने नुकतीच धाड टाकली. यामध्ये बोगस प्रमाणपत्रांसह पंचायत समिती अधिकारी तसेच ठेकादारांची स्वाक्षरी असलेले कोरे अर्ज आढळून आले. या प्रकरणी सुनील दयालराव ढोरे (३४, रा. शांतीनगर, राळेगाव) व प्रज्वल शिरसकर (२५, रा.कळंब) या दोघांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनेत विविध योजनांचा फायदा घेण्यासाठी मोठ्या संख्येने बोगस मजुरांची नोंदणी झाली आहे. याबाबत बोगस मजुरांच्या लक्षणीय आकड्यासोबतच पेटी व गृहोपयोगी वस्तूंच्या वाटपात होणाऱ्या गैरप्रकारावर वृत्त प्रकाशित झाले होते. आता ही कारवाई झाल्याने या योजनेतील अनागोंदी कारभारावर मोहोर उमटली आहे.

कामगार मंत्री, प्रधान सचिव (कामगार), सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बोगस बांधकाम कामगार प्रमाणपत्र प्रकरणी कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार कामगार उपआयुक्त चंद्रकांत राऊत यांनी बांधकाम कामगारांच्या बोगस कागदपत्रांद्वारे होणाऱ्या नोंदणीबाबत अमरावती विभागाची बैठक घेऊन दक्षता पथके गठित केली.

बोगस नोंदणी करणारे दलाल, संशयित व्यक्तींविरोधात कारवाईच्या सूचना दिल्या. जिल्ह्यात कामगार अधिकारी राहुल काळे यांच्या मार्गदर्शनात राजेश वनारे व सतीश देशमुख यांनी राळेगाव येथील नाविन्य कॉम्प्युटर व कळंब येथील साई कॉम्प्युटरमध्ये धाड टाकली. त्यावरून राळेगाव व कळंब पोलिस ठाण्यात राजेश वनारे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोघांवर गुन्हे दाखल केले आहे.

### दलालांसह संगणक चालकही आघाडीवर

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ही योजना सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरली आहे. मोठ्या संख्येने यात गैरमजुरांचा भरणा झाला आहे. बोगस मजूर होणे अतिशय सोपे असल्याचे वातावरण जिल्ह्यात आजही आहे. दलाल घरोघरी जाऊन महिलांची बैठक घेतात. बोगस मजूर होण्यासोबतच योजना नुतनीकरण, पेटी, शिष्यवृत्ती, गृहोपयोगी वस्तू, लग्नासाठी आर्थिक मदत यासारख्या योजनांचा लाभ मिळवून देण्यसाठी हे दलाल लोकांकडून आजही पैसे उकळत आहे. बनावट कागदपत्रांना तयार करण्यात संगणक चालक आघाडीवर आहे.**




### स्वाक्षरीचे कोरे प्रमाणपत्रे आढळली

**कळंब येथील साई कॉम्प्युटर व राळेगावातील नाविन्य कॉम्प्युटरच्या माध्यमातून कामगार नोंदणीचे बनावट प्रमाणपत्र दिले जात असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार धाड टाकण्यात आली. यामध्ये राळेगाव येथील संगणक दुकानात ९० दिवसांचे बनावट प्रमाणपत्राशी संबंधित ६० कागदपत्रे ताब्यात घेण्यात आले आहे. यासोबतच साई सेंटरमध्ये कळंब नगर पंचायतमधील अधिकाऱ्यांनी सही केलेली कोरी कागदपत्रे तसेच प्राधिकृत अधिकारी व ठेकेदारांच्या स्वाक्षरीचे कोरे प्रमाणपत्रेसुद्धा आढळून आली आहे. या कारवाईने इतर संगणक चालक सावध झाले आहेत. मागील पाच वर्षातली ही पहिली कारवाई आहे.**


**नगर पंचायत कार्यालय, सडक अर्जुनी**
**तालुका- सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया**

निविदा सुचना क्र. ३०८/ बांधकाम/२०२५ दिनांक ०२/०७/२०२५

**निविदा सुचना**

सडक अर्जुनी नगर पंचायत बांधकाम विभागातर्फे अग्निशमक व आणीबाणींच्या सेवांचे बळकटीकरण योजना सन २०२४-२५ अंतर्गत अग्निशमन पुरक साहित्य खरेदी करणे. या कामाचे निविदा द्वि-लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आ हेत. सदरहू कामाचे निविदा फार्म /अटी व शर्ती नगर पंचायत कार्यालय सडक अर्जुनी येथून प्राप्त करता येतील. निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

निविदा प्रसिध्दीचा तपशील

| | |
|---|---|
| निविदा फार्म विक्री | दि. ०३/०७/२०२५ दुपारी १२.०० वाजे पासुन |
| निविदा फार्म विक्री अंतिम दिनांक | दि. ०९/०७/२०२५ दुपारी ३.०० वाजे पर्यंत |
| निविदा दाखल करण्याचा दिनांक | दि. ०३/०७/२०२५ दुपारी ३.०० वाजे पासुन |
| निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. ०९/०७/२०२५ सायं. ५.०० वाजे पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि. १०/०७/२०२५ दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास) |

टिप :- १) निविदेसंबंधी कामाची सर्व आवश्यक माहीती नगर पंचायत सडक अर्जुनी कार्यालयाच्या बांधकाम विभागात उपलब्ध राहतील. २) निविदा संबंधीत सर्व माहिती काळजीपूर्वक वाचुनच भरण्यात यावी. परिपुर्ण नसलेली निविदा स्विकृत केल्या जाणार नाही. ३) निविदेसंबंधी सर्वस्वी अधिकार मुख्याधिकारी, नगर पंचायत सडक अर्जुनी यांचेकडे राहतील.

-स्वा./- श्री. तेजराम मडावी, अध्यक्ष, नगर पंचायत सडक अर्जुनी
-स्वा./- सौ. वंदना डोंगरवार, उपाध्यक्ष, नगर पंचायत सडक अर्जुनी
-स्वा./- श्री. सारंग खांडेकर, मुख्याधिकारी, नगर पंचायत सडक अर्जुनी

# भारताच्या वैभवने इंग्लंडच्या गोलंदाजांना लोळवले

## तिसऱ्या वनडेत तुफानी खेळी, ठोकले ९ षटकार आणि ६ चौकार

**वृत्तसंस्था/लंडन**

सध्या इंग्लंडमध्ये भारताच्या १९ वर्षांखालील आणि इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघांमध्ये एकदिवसीय मालिका खेळली जात आहे, ज्यामध्ये १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी अप्रतिम कामगिरी केली आहे. मालिकेतील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात वैभवने इंग्लंडच्या गोलंदाजांची धुलाई करत इतिहास रचला.

वैभव सूर्यवंशीने मालिकेतील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात अवघ्या ३१ चेंडूंमध्ये ८६ धावांची वादळी खेळी साकारली. या खेळीदरम्यान वैभवने ९ षटकार आणि ६ चौकार मारले. यावेळी त्याचा स्ट्राइक रेट २७७ इतका होता. या कामगिरीसह वैभव अंडर-१९ एकदिवसीय सामन्यात एका डावात सर्वाधिक षटकार मारणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.



याशिवाय, वैभव सूर्यवंशी हा अंडर-१९ वनडेमध्ये सर्वात जलद अर्धशतक ठोकणारा दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. या सामन्यात त्याने अवघ्या २० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले होते. वैभव सूर्यवंशीपूर्वी एका डावात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम राजा बावा याच्या नावावर होता. त्याने २०२२ मध्ये युगांडाविरुद्ध एका डावात ८ षटकार मारले होते.

**भारताचा इंग्लंडवर ४ विकेट्सने विजय**

इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाने प्रथम फलंदाजी करत ४० षटकांत २६८ धावा केल्या. इंग्लंडकडून कर्णधार थॉमस रेव्हने सर्वाधिक ७६ धावा केल्या. भारताला विजयासाठी ४० षटकांत २६९ धावांची आवश्यकता होती. लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार अभिज्ञान कुंडू १२ धावा करून बाद झाला. पण यानंतर वैभव सूर्यवंशीने तडाखेबंद फलंदाजी करत पहिल्या २० चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. वैभवने ३१ चेंडूत ९ षटकार आणि ६ चौकारांसह ८६ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या विहान मल्होत्रानेही ३४ चेंडूत ४६ धावांची महत्त्वाची खेळी केली. भारतीय संघाला या मालिकेतील दुसरा विजय मिळवून दिला.

### इंग्लंड दौऱ्यावर वैभवचे शानदार प्रदर्शन

**१४ वर्षीय वैभवसाठी इंग्लंड दौरा आतापर्यंत अप्रतिम राहिला आहे. मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात या खेळाडूने १९ चेंडूंमध्ये ४८ धावांची खणखणीत खेळी केली होती, ज्यामुळे भारतीय संघाने पहिला सामना जिंकला. दुसऱ्या सामन्यात वैभवच्या बॅटमधून ४५ धावा निघाल्या, परंतु या सामन्यात भारतीय संघाला पराभव स्वीकारावा लागला. मात्र, तिसऱ्या सामन्यात वैभवने पुन्हा एकदा दमदार फलंदाजी करत ८६ धावांची तुफानी खेळी करून संघाला विजय मिळवून दिला. आता भारताने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे.**

# कॅप्टन्सीत शतकी 'रोमान्स'!

## शुबमन गिलने मारली विराटसह या दिग्गजांच्या क्लबमध्ये 'एन्ट्री'



**वृत्तसंस्था/बर्मिंगहॅम**

इंग्लंड विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार शुभमन गिलने शतकी खेळीसह खास विक्रमाला गवसणी घातली आहे. भारतीय कसोटी संघाचे नेतृत्व करताना सलग दुसऱ्या सामन्यात त्याच्या भात्यातून शतक पाहायला मिळाले. अशी कामगिरी करणारा तो चौथा भारतीय कर्णधार ठरला आहे. याआधी विजय हजारे, सुनील गावसकर आणि विराट कोहली यांनी हा पराक्रम करून दाखवला होता.

दरम्यान, इंग्लंड दौऱ्यातील लीड्सच्या हेडिंग्लेच्या मैदानातून शुबमन गिलने कसोटी संघाच्या नेतृत्वासह आपल्या नव्या इनिंगला सुरुवात केली. पहिल्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात शुबमन गिलने १४७ धावांची खेळी केली होती. दुसऱ्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात जो रुटच्या गोलंदाजीवर सलग दोन चौकार मारत भारतीय कसोटी संघाच्या नव्या कर्णधाराने १९९ चेंडूत ११ चौकाराच्या मदतीने शतक पूर्ण केले. कसोटी कारकिर्दीतील त्याचे हे सातवे शतक आहे.

### पहिल्या दोन कसोटी सामन्यात शतक झळकवणारे भारतीय कर्णधार


**१९५१ मध्ये विजय हजारे यांनी इंग्लंड विरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यात नाबाद १६४ धावांची खेळी केली होती. याच मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्यांच्या भात्यातून पहिल्या डावात १५५ धावांची खेळी पाहायला मिळाली होती. लिटल मास्टर सुनील गावस्कर यांनी १९७६ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात ११६ धावांची खेळी केली होती. १९७८ मध्ये कॅप्टन्सीतील दुसऱ्या कसोटी सामन्यात त्यांनी वेस्ट इंडिज विरुद्धच्या सामन्यातील पहिल्या डावात २०५ धावांची खेळी केल्याचा रेकॉर्ड आहे. विराट कोहलीने २०१४-१५ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारतीय संघाचे नेतृत्व करताना पहिल्या कसोटी सामन्यात ११५ आणि १४१ धावा आणि दुसऱ्या कसोटी सामन्यात १४७ धावांची खेळी केली होती.**

# लिव्हरपूलचा फुटबॉलपटू डिओगो जोटाचे कार अपघातात निधन

## २८व्या वर्षीच घेतला जगाचा निरोप

**वृत्तसंस्था/माद्रिद**

पोर्तुगाल आणि लिव्हरपूलचा फुटबॉलपटू डिओगो जोटाचे वयाच्या २८व्या वर्षी कार अपघातात निधन झाले आहे. जोटा आणि त्याच्या भावाचा स्पेनमधील झमोरा शहरात कार अपघात मृत्यू झाल्याची माहिती आहे. डिओगो जोटाच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले आहेत.



डिओगो जोटाची लॅम्बोर्गिनी कार दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करताना टायर फुटल्यामुळे रस्ता सोडून गेली आणि नंतर ती आगीत जळून खाक झाली. स्पेनच्या वायव्येकडील झमोराजवळ हा अपघात झाला. जोटाचा भाऊ आंद्रे सिल्वाही या अपघातामध्ये ठार झाला आहे. २६ वर्षीय सिल्वा पोर्तुगीज फुटबॉलच्या दुसऱ्या श्रेणीत पेनाफिलकडून खेळत होता.

दरम्यान, गेल्या हंगामात लिव्हरपूलसोबत प्रीमियर लीगचे विजेतेपद जिंकणारा आणि पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघासाठी डिओगो जोटा खेळला होता. त्याचप्रमाणे २०१९ आणि २०२५ मध्ये यूईएफए नेशन्स लीग जिंकणाऱ्या पोर्तुगाल संघाचाही तो भाग होता. २८ वर्षीय जोटाने दोन आठवड्यांपूर्वीच रुट काडोसोशी लग्न केले होते.



भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना एजबॅस्टन येथे खेळला जात आहे. शुभमन गिलने रवींद्र जडेजासोबत द्विशतकी भागीदारी केली. रवींद्र जडेजा ८९ धावाकाढून बाद झाला तर गिलने आपले द्विशतक पूर्ण करीत गिल २६९ धावांवर बाद झाला.

# विम्बल्डनमध्ये कार्लोस अल्कारेझची आगेकूच कायम

**वृत्तसंस्था/लंडन**

स्पेनच्या द्वितीय मानांकित कार्लोस अल्कारेझने विम्बल्डनच्या तिसऱ्या फेरीत आपला प्रवेश निश्चित केला. त्याने ब्रिटीश टेनिसपटू ऑलिव्हर टार्वेटचा सलग तीन सेटमध्ये पराभव केला.

फ्रेंच ओपन विजेत्या कार्लोस अल्कारेझला विम्बल्डनचा आपला दुसऱ्या फेरीचा सामना जिंकण्यासाठी फारसे कष्ट करावे लागले नाहीत. त्याने ऑलिव्हरवर ६-१,६-४,६-४ ने मात करत तिसऱ्या फेरीमध्ये दिमाखात प्रवेश केला. आता पुढच्या फेरीत त्याचा मुकाबला कॅनडाचा २५ वा मानांकित टेनिसपटू फेलिक्स अथवा जर्मनीच्या जेन-लेनार्ड स्टर्फ या दोघांच्या विजेत्या टेनिसपटूशी होणार आहे.



महिला एकेरीच्या सामन्यात अव्वल सीडेड बेलारुसच्या अर्याना सबालेन्काने विम्बल्डनची तिसरी फेरी गाठली आहे. तिने बिगर मानांकित मेरी बोऊझकोव्हावर ७-६, ६-४ ने पराभव केला. या हंगमात विम्बल्डनमध्ये अनेक मानांकित टेनिसपटूंना पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. मात्र, अल्कारेझ आणि सबालेन्काने विम्बल्डनमधील आपले आव्हान कायम राखण्यात यश मिळवले आहे.

# मी या कम्युनिस्ट वेड्याला न्यूयॉर्क उद्ध्वस्त करू देणार नाही - ट्रम्प

## भारतीय वंशाच्या जोहरान ममदानींवर टीका

**वृत्तसंस्था/न्यूयॉर्क**

अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या महापौर निवडणुकीवरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी डेमोक्रॅटिक महापौरपदाचे उमेदवार जोहरान ममदानी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. एवढेच नाही तर त्यांनी ममदानी यांना कम्युनिस्ट वेडे आणि धोकादायक व्यक्ती म्हटले आहे. जर ममदानी महापौर झाले तर ते न्यूयॉर्क उद्ध्वस्त करतील,असा मोठा दावा देखील राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून, मी या कम्युनिस्ट वेड्याला न्यूयॉर्क उद्ध्वस्त करू देणार नाही. माझ्याकडे सर्व अधिकार आणि पर्याय आहेत. मी न्यूयॉर्क शहर वाचवीन आणि ते पुन्हा 'महान' बनवीन, जसे मी जुन्या अमेरिकेत केले होते,असे म्हटले आहे.



दरम्यान, ममदानी यांनीही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली. ममदानी म्हणाले की, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी मला अटक करण्याची, माझे नागरिकत्व काढून घेण्याची, मला डिटेंशन कॅम्पमध्ये टाकण्याची आणि मला हद्दपार करण्याची धमकी दिली आहे. मी कोणताही कायदा मोडला आहे म्हणून नाही, तर मी आयसीईला आमच्या शहरात दहशत पसरवू देणार नाही म्हणून, असे म्हटले आहे. तसेच ममदानी म्हणाले की, त्यांची विधाने केवळ आपल्या लोकशाहीवर हल्ला नाहीत तर त्यांच्या सावलीत लपण्यास नकार देणाऱ्या प्रत्येक न्यूयॉर्करला संदेश देण्याचा प्रयत्न आहेत. जर तुम्ही बोललात तर ते तुमच्या मागे येतील, असेही ते म्हणाले.

### जोहरान ममदानी कोण आहे?



**महापौरपदासाठी डेमोक्रॅटिक उमेदवार बनलेले ममदानी नोव्हेंबरमध्ये निवडून आले तर ते न्यूयॉर्क शहराचे पहिले मुस्लीम महापौर असतील. गेल्या महिन्यात न्यूयॉर्कच्या महापौरपदाच्या प्राथमिक निवडणुकीत ममदानी यांनी माजी महापौर अँड्र्यू कुओमो यांना ३३ वर्षे पराभूत केले. ३३ वर्षीय ममदानी सध्या न्यूयॉर्क राज्य विधानसभेत आमदार आहेत आणि स्वतःला लोकशाही समाजवादी म्हणून वर्णन करतात. जोहरानच्या वडिलांचे नाव मोहम्मद ममदानी होते तर त्याची आई भारतीय-अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक मीरा नायर आहे.**

# इंडोनेशियातील बाली बेटाजवळ जहाज बुडाले

## चार जणांचा मृत्यू, ३८ जण बेपत्ता, नऊ बोटी बचावकार्यात गुंतल्या

**वृत्तसंस्था/बाली**

इंडोनेशियातील बाली बेटाजवळ गुरुवारी ६५ जणांना घेऊन जाणारे जहाज बुडाल्याने चार जणांचा मृत्यू झाला. या अपघातात ३८ जण अजूनही बेपत्ता असून आणि २३ जणांना वाचवण्यात यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार. केएमपी तुनु प्रतमा जया हे जहाज पूर्व जावामधील केतापांग बंदरातून बालीमधील गिलिमानुक बंदरापर्यंत ५० किलोमीटर अंतरावर जात होते. निघाल्यानंतर सुमारे ३० मिनिटांनी ते बुडाले. जहाजात सुमारे ५३ प्रवासी आणि १२ क्रू मेंबर्स होते. तसेच २२ वाहने होती, ज्यात अनेक ट्रक होते.



दरम्यान, आतापर्यंत दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत आणि २० जणांना वाचवण्यात आले आहे. सुटका केलेल्या अनेक लोकांची प्रकृती गंभीर आहे. विशेष म्हणजे, सुराबाया बचाव संस्थेने गुरुवारी एका निवेदनात म्हटले आहे की, स्थानिक वेळेनुसार रात्री ११:२० वाजता जहाज बुडाले. टगबोट्स आणि फुगवता येणाऱ्या जहाजांसह नऊ बचाव बोटी बेपत्ता लोकांचा सक्रियपणे शोध घेत आहेत. दोन मीटर उंचीच्या लाटांमुळे बचाव पथकांना लोकांना शोधणे कठीण होत आहे. राष्ट्रीय शोध आणि बचाव संस्थेने म्हटले आहे की, सर्व बेपत्ता लोक सापडेपर्यंत प्रयत्न सुरूच राहतील.

### ३ जानेवारी रोजी बोट बुडाल्याने ८ जणांचा मृत्यू झाला

**३ जानेवारी २०२५ रोजी इंडोनेशियातील मालुकू येथे दोन नोना ही स्पीडबोट बुडाली. ही बोट सेराम भागियान बारातहून अंबोनला जात होती. वाटेत ती एका तरंगत्या लाकडाशी धडकली, ज्यामुळे तिचा कवच तुटला आणि ती बुडाली. बोटीत ३० प्रवासी होते, त्यापैकी ८ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण गंभीर जखमी झाले.**

# युक्रेनच्या हल्ल्यात मिखाईल गुडकोव्ह ठार

**वृत्तसंस्था/कुर्स्क**

रशियन नौदलाचे उपप्रमुख व अनुभवी मरीन ब्रिगेडचे माजी कमांडर मेजर जनरल मिखाईल गुडकोव्ह (४२) यांचा युद्धात मृत्यू झाला आहे, अशी माहिती रशियन संरक्षण मंत्रालयाने गुरुवारी दिली. यामुळे युक्रेनविरुद्धच्या युद्धात रशियाला मोठा धक्का बसला आहे.

गुडकोव्ह यांचा मृत्यू बुधवारी (दि. २ जुलै) कुर्स्क या युक्रेनच्या सीमेलगत असलेल्या रशियन सीमावर्ती जिल्ह्यांपैकी एका भागात लढाई दरम्यानच्या कर्तव्यपूर्तीत झाला, असे रशियन संरक्षण मंत्रालयाने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे. गुडकोव्ह हे २००० पासून रशियन लष्करात कार्यरत होते आणि २०२३ साली राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी त्यांना रशियाच्या सर्वोच्च सन्मानाने 'हीरो ऑफ द रशियन फेडरेशन' गौरवले होते. सध्या ते युक्रेनविरोधात लढणाऱ्या एका नौदल ब्रिगेडचे नेतृत्व करत होते.



# १५ वर्षीय हिंदू मुलीचे बंदुकीचा धाक दाखवून केले अपहरण

## पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील घटना

**वृत्तसंस्था/पेशावर**

पाकिस्तानच्या सिंध प्रांतात एका १५ वर्षीय हिंदू मुलीचे बंदुकीचा धाक दाखवून अपहरण करण्यात आले. नंतर तिचे लग्न लावले गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. ही घटना उघडकीस येताच संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. मानवाधिकार आयोगाने या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल मागवला आहे. सिंध प्रांत हा पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांचा बालेकिल्ला मानला जातो.

पाकमधील एका वृत्तपत्रानुसार, सिंध प्रांतातील मातली गावात ४५ वर्षीय व्यक्तीने मानवाधिकार आयोगाकडे या संदर्भात तक्रार दाखल केली. दिलेल्या तक्रारीनुसार, चार तरुणांनी प्रथम त्याच्या घरात घुसून नंतर त्याच्या १५ वर्षीय भाचीला पळवून नेले. काही वेळाने त्याच्या भाचीचे लग्न लावले गेल्याची बातमी समोर आली. या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची विनंती त्या व्यक्तीने केली आहे.

### मानवाधिकार आयोग सक्रिय, परिसरात दहशत

**बंदुकीच्या धाकावर मुलीचे ज्या पद्धतीने अपहरण करण्यात आले, त्यामुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली आहे. स्थानिक पोलिसांचे म्हणणे आहे की, आरोपी व्यक्तीची ओळख पटली आहे. दोन आरोपींची नावेही जाहीर करण्यात आली आहेत. त्यांची नावे मन्सूर डार आणि मकसूद डार अशी आहेत. मात्र, त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. मानवाधिकार आयोगाने पाकिस्तान दंड संहितेच्या कलम ३६५-ब, ३६४-अ आणि ५०६ अंतर्गत या प्रकरणात कारवाई करण्यास सांगितले आहे. तसेच, आयोगाने मुलीची तात्काळ सुटका करण्याचेही आदेश दिले आहेत. पाकिस्तानमध्ये अल्पवयीन मुलीशी लग्न करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. अलिकडेच पाकिस्तान सरकारने याबाबत कठोर कायदा लागू केला आहे. उल्लंघन करणाऱ्या आरोपींना सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल.**

# बांगलादेशात शेख हसीनांची अजूनही दहशत कायम!

## विरोधात साक्ष देण्यासाठी कुणीच पुढे येईना : साक्ष दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा अहवालात दावा

**वृत्तसंस्था/ढाका**

शेख हसीना बांगलादेशातून बाहेर पडून आता जवळजवळ एक वर्ष झाले आहे, परंतु तसे असूनही बांगलादेशातील लोकांमध्ये त्यांच्याबद्दल असलेली दहशत कायम आहे. बांगलादेशच्या नवीन सरकारने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. त्याअंतर्गत त्यांच्याविरुद्ध खटला चालवला जात आहे. पण त्यांच्या १५ वर्षांच्या कार्यकाळात झालेल्या अत्याचारांविरुद्ध साक्ष देण्यासाठी लोक अद्यापही पुढे येण्यास तयार नाहीत. अनेक अहवालांमध्ये असा दावा केला जात आहे की, साक्ष दिल्यास लोकांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.



स्थानिक माध्यमांनुसार, फोनवरून झालेल्या संभाषणात शेख हसीना यांनी मूळ पक्षकार, साक्षीदार, तपास अधिकारी आणि खटल्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या लोकांना ठार मारण्याची आणि त्यांची घरे जाळण्याची धमकी दिली आहे. पण हा प्रकार आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरण कायदा, १९७३ च्या कलम ११ (४) नुसार न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत अडथळा आणण्यासारखी आहे. असे केल्याबद्दल न्यायालयाने शेख हसीना यांना सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे.

### साक्षीदार साक्ष देण्यास घाबरतात - सरकारी वकील

**एका प्रश्नाच्या उत्तरात, बांगलादेश सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य सरकारी वकील मोहम्मद ताजुल म्हणाले की, आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या तपास संस्थेने फोनवरून केलेल्या संभाषणात सांगितले आहे की साक्षीदार साक्ष देण्यास घाबरतात. अनेक लोक येथे खटले नोंदवण्यासाठी येण्यास भीती व्यक्त करतात. हा प्रकार न्यायाधिकरणाच्या सुनावणी प्रक्रियेत अडथळा आणण्यासारखे आहे. आम्हाला धमकावण्यात आले आहे, पण आम्ही घाबरत नाही. आम्हाला कशाचीही भीती नाही. जर तपास अधिकाऱ्यांना धमकावले गेले तर त्याचा प्रकरणाच्या तपासावर परिणाम होईल. म्हणूनच न्यायालयाच्या अवमानाची तक्रार दाखल करण्यात आली आहे, असेही ताजुल यांनी सांगितले.**

### हसीना यांच्यावर २२७ गुन्हे दाखल

**बांगलादेशातील विविध पोलिस स्टेशन आणि न्यायालयात शेख हसीना यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या २२७ खटल्यांमधील वादींना आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या प्रकरणांमध्ये साक्षीदार बनवण्यात आले आहे. इतकेच नाही तर २२७ प्रकरणांपैकी अनेक प्रकरणे हस्तांतरित करून न्यायाधिकरणाकडे आणण्यात आली आहेत.**

# थायलंडला दोन दिवसांत मिळाला दुसरा पंतप्रधान

**बँकॉक** : थायलंडला दोन दिवसांत दुसरे पंतप्रधान मिळाले आहेत. गृहमंत्री फुमथम वेचायचाई यांनी गुरुवारी कार्यवाहक पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. त्यांनी २४ तास पंतप्रधान राहिलेल्या सुरिया जुंगरुंगरेंगकिट यांची जागा घेतली. बुधवारी सूर्या जुंगरुनग्रेंगकिट यांची देशाचे काळजीवाहू पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली. ७० वर्षीय सूर्या यांनी निलंबित पंतप्रधान पाइतोंगटार्न शिनावात्रा यांची जागा घेतली, ज्यांना १ जुलै रोजी पदावरून काढून टाकण्यात आले होते. पाइतोंगटार्न शिनावात्रा यांच्यावर एका वरिष्ठ कंबोडियन नेत्याशी दूरध्वनीवरून संभाषण केल्याचा आरोप आहे, जो सार्वजनिक झाला आणि मंत्रिमंडळाच्या नैतिक नियमांचे उल्लंघन मानला गेला.